# नवदुर्गा:

## प्राचीन संकल्पना रूपके

अरूण फडके



# नवदुर्गा: प्राचीन संकल्पना रूपके

## हे पुस्तक विनामूल्य आहे

## पण फ़ुकट नाही

यामागे अनेकांचे कष्ट व पैसे आहेत.

## हे वाचल्यावर खर्च करा ३ मिनिटे

१ मिनिट : लेखकांना फ़ोन करून हे पुस्तक कसे वाटले ते कळवा

१ मिनिट : ई साहित्य प्रतिष्ठानला मेल करून हे पुस्तक कसे वाटले ते कळवा.

१ मिनिट : आपले मित्र व ओळखीच्या सर्व मराठी लोकांना या पुस्तकाबद्दल अणि ई साहित्यबद्दल सांगा.

### असे न केल्यास यापुढे आपल्याला पुस्तके मिळणे बंद होऊ शकते.

## दाम नाही मागत. मागत आहे दाद.
## साद आहे आमची, हवा प्रतिसाद.

दाद म्हणजे स्तुतीच असावी असे नाही. प्रांजळ मत, सूचना, टीका, विरोधी मत यांचे स्वागत आहे. प्रामाणिक मत असावे. ज्यामुळे लेखकाला प्रगती करण्यासाठी दिशा ठरवण्यास मदत होते. मराठीत अधिक कसदार लेखन व्हावे आणि त्यातून वाचक अधिकाधिक प्रगल्भ व्हावा आणि अखेर संपूर्ण समाज एका नव्या प्रबुद्ध उंचीवर जात रहावा.

# ई साहित्य प्रतिष्ठान

सादर करीत आहे

# नवदुर्गा: प्राचीन संकल्पना रूपके

लेखक

## अरुण फडके

# नवदुर्गा: प्राचीन संकल्पना रूपके

## लेखक... अरुण फडके

पत्ता- अरुण फडके, १९, अमिता सोसायटी, चवथा मजला, कान्होजी आंग्रे मार्ग, कोलडोंगरी, अंधेरी (पूर्व), मुंबई ४०००६९.
M: 7400173637M: ७४००१७३६३७,
sheroophadke@gmail.com

या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क लेखकाकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण व नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी लेखकाची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे. तसे न केल्यास कायदेशीर कारवाई होऊ शकते.

This declaration is as per the Copyright Act 1957 read with Sections 43 and 66 of the IT Act 2000. Copyright protection in India is available for any literary, dramatic, musical, sound recording and artistic work. The Copyright Act 1957 provides for registration of such works. Although an author's copyright in a work is recognised even without registration. Infringement of copyright entitles the owner to remedies of injunction, damages and accounts.

# प्रकाशक : ई साहित्य प्रतिष्ठान


www.esahity.in
www.esahity.com
esahity@gmail.com
eSahity Pratishthan
eleventh floor
eternity
eastern express highway
Thane. 400604

**प्रकाशन : २५ ऑक्टोबर २०२० (विजयादशमी)**

©esahity Pratishthan®2020

- विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध.
- आपले वाचून झाल्यावर आपण हे फ़ॉरवर्ड करू शकता.
- हे ई पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापुर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापुर्वी ई साहित्य प्रतिष्ठानची परवानगी घेणे-

# अरुण फडके



अरुण फडके हे एक अभ्यासू लेखक म्हणून सुपरिचित आहेत. फ्रीमेसनरी या प्राचीन जागतिक संघटनेचे सदस्य व संघटनेच्या भारतातील इतिहासाचे अभ्यासक, एक इंटरनॅशनल कॉफी टेबल बुक प्रकाशित आहे. ते विस्मृतीत गेलेल्या मराठी म्हणी - वाक्प्रचार याचे अभ्यासक असून ६० लेखांची लेखमाला तरुण भारत मधे प्रकाशित झाली आहे.

त्यांचा अभ्यासाचा मुख्य विषय आहे सिंबॉल-सिंबॉलिझम-ॲलिगरी, अर्थात रूपकशास्त्र – प्रतीकशास्त्र -- चिन्ह – चिन्हसंकेत - चिन्हार्थ. याही विषयावर दैनिक मुंबई तरुण भारतमधे ६० लेखांची लेखमाला प्रकाशित झाली. चिह्न निमित्त – निमित्त चिह्न हे पुस्तक लवकरच येत आहे. विलेपारल्यातील बलुतेदार ही मासिक २४ लेखांची लेखमाला अभूतपूर्व या मासिकात प्रकाशित. सध्या लोकमान्य सेवा संघाच्या शताब्दी इतिहास खंडाचे लेखन सुरू. बालनाट्य चळवळ, प्रायोगिक-व्यवसायिक नाट्य चळवळींचा इतिहास व विलेपार्ल्यातील रंगकर्मी यांचा परीचय करून देणाऱ्या पुस्तकाचे संकलन-लेखन सुरु आहे.

अनेक नामवंत संस्थांच्या कार्यात त्यांचा सहभाग असतो. लोकमान्य सेवा संघ, पारले. गॉसिप ग्रुप ही प्रायोगिक रंगभूमीवरील संस्था, नाट्यसंपदा प्रतिष्ठान, कै मो ग रांगणेकर जन्मशताब्दी महोत्सव, जागतिक चित्पावन महासंमेलन, म ल डहाणूकर वाणिज्य महाविद्यालय माजी विद्यार्थी संघटना आदींचे ते आघाडीचे कार्यकर्ते विश्वस्त आहेत. तसेच ते मोठ्या उत्सवी कार्यक्रमांचे अनुभवी संघटक (Event designer) व Heritage Structure Rehabilitation & Restoration या विषयातील अनेक यंत्र-तंत्रांचे विशेषज्ञ आहेत

# प्रस्तावना

**डॉ निर्मोही फडके.**

दुर्गेची विविध रूपं नि तिची विविध प्रकारे केली जाणारी उपासना. भारतीय संस्कृतीचं हे एक लखलखीत वैशिष्ट्यं. अशा नवनवोन्मेषशालिनी दुर्गेच्या विविध रूपांबद्दल रंजक आणि उद्बोधक माहिती लिहिली आहे, प्रसिद्ध लेखक आणि चिह्नसंकल्पनांचे अभ्यासक श्री. अरुण फडके ह्यांनी, नवदुर्गा: प्राचीन संकल्पना रूपके या ऑनलाईन लेखमालेत. दुर्गा या संकल्पनेसंबंधी पौराणिक, शास्त्रीय, विज्ञाननिष्ठ आणि लोकसंस्कृती असा विविधांगांनी अभ्यास करून फडकेसरांनी नवरात्रीनिमित्त सर्व अभ्यासकांना, जिज्ञासूंना ही अप्रतिम शब्दभेट दिली आहे. श्री. अरुण फडके सरांचं मनःपूर्वक अभिनंदन!

माणसाच्या उत्क्रान्तीपासूनच त्याला या निसर्गशक्तींविषयी अप्रूप वाटत आलं. स्वतःच्या जन्म-मृत्यूविषयी, अस्तित्वाविषयी तो स्वतःच्याच बुद्धीला शतकानुशतकं 'कोऽहम्'चा प्रश्न विचारत आला. या प्रश्नांमधून त्याच्या बुद्धीला कळलेली, पटलेली, तयार केली गेलेली काही तत्त्वं त्याने आपल्या मानवी भाषेत मांडली. वृद्धिंगत होत गेला मानवाच्या ज्ञानाचा आणि विज्ञानाचा महासागर.

विश्वातील, सृष्टीमधील अनेक अद्भुतांबद्दल माणसाला वाटणारं अनाकलनीय आकर्षण हे आपल्या भारतीय परंपरेत अबाधित आहे. त्यातून निर्माण झाले विविध प्रकारचे विधी, मिथकं, रूढी इत्यादी. त्यातील काही घटकांना लोकसंस्कृतीचा पाया आहे, काहींना समाजव्यवस्थेचा, तर काहींना विज्ञानाच्या प्रमेयांची जोड.

भारतीय संस्कृती ही अधिकतर कृषिप्रधान संस्कृती आहे. तसंच येथील जीवनव्यवहारात अनेक वंश, धर्म, पंथ, विचारसरणी, संस्कृती, शास्त्रं इत्यादींची सरमिसळ झालेली आहे. ऋतुबदलांप्रमाणे होणारे विविध

विधी, लोकउत्सव, सण हे येथील जगण्याचा एक महत्त्वाचा भाग आहेत. या आधुनिक काळातही ते जपले गेले आहेत.

पुरुषतत्त्वाबरोबरच स्त्रीतत्त्वाविषयीचं अमाप कुतूहल इथल्या लोक आणि अभिजात संस्कृतीनं विविध प्रकारे सांभाळलं. या कुतूहलातूनच स्त्रीतत्त्वाचं केलं गेलेलं दैवतीकरण ही भावना इथल्या अनेक सण, उत्सव, परंपरांना जन्म देणारी ठरली. शतकानुशतकं भारतीय संस्कृतीमध्ये स्त्रीतत्त्वाच्या विविध देवीस्वरूपांची सगुण आराधना केली जात आहे. विविध भारतीय भाषांमध्ये याबद्दल ग्रंथ लिहिले गेले आहेत, गाथा, श्लोक, आरत्या, कहाण्या इत्यादी रूपांत. या सगळयांमधून मनुष्यजन्मामधील स्त्रीतत्त्वाचं महत्त्व याबद्दल वैविध्यपूर्ण माहिती, दंतकथा, आख्यायिका, लोकगीतं, विधिनाट्य अस्तित्वात आली.

फडकेसरांनी नवदुर्गा: प्राचीन संकल्पना रूपके या आपल्या लेखांमध्ये वर उल्लेख केलेल्या अनेक मुद्द्यांचा परामर्ष घेत हे स्त्रीतत्त्व आणि त्याची आभा ह्यांचा वस्तुनिष्ठपणे अभ्यास करून, सोदाहरण मांडणी केली आहे. देवी ह्या संकल्पनेचे धार्मिक उदात्तीकरण न करता, अतिशय कमी शब्दांत त्या तत्त्वाचं आपल्या जीवनाशी असणारं जोडलेपण दाखवलं आहे. फडकेसरांची अभ्यासू वृत्ती यापाठीमागे दिसून येते.

नवरात्रीतील रांगोळी, घट, कलश इत्यादींची रचना, महत्त्व, त्यांतील कलात्मकता इथपासून ते देवीची स्त्रीतत्त्वातील विविध शारीरिक स्थित्यंतरं, त्यानुसार बदललेली नावं, पूजाविधी, लोकसमजुती, वैज्ञानिक सिद्धांत यांचा ऊहापोह या लेखांमध्ये केला आहे. सर्वात महत्त्वाचं म्हणजे सर्जनप्रक्रिया आणि देवीची विविध रूपं, या सर्व घटकांचा असलेला आंतरिक संबंध इत्यादीविषयी थोडक्यात पण अभ्यसनीय असा उलगडा सरांनी केला आहे.

सध्याच्या जागतिक आपत्तीच्या काळात माणसाच्या जगण्याच्या आणि खरंतर मरणाच्याही व्याख्या बदलल्या आहेत. आयुष्यात कोणत्या

गोष्टींना प्राधान्य द्यावं, याबाबतची विचारसरणी बदलली आहे. तसं पाहिलं तर आपण भारतीय उत्सवी वृत्तीचे आहोत. परंतु अपरिहार्यपणे एकमेकांपासून दूर राहण्याची वेळ आलेली असूनही आपण काही प्रमाणात आपल्या परंपरा जपत आहोत. त्या अधिक डोळसपणे, सजगपणे जपाव्यात हा या लेखमालिकेमागील एक प्रामाणिक हेतू.

E साहित्य प्रतिष्ठान ही डिजिटल पुस्तक प्रकाशनातील एक नामांकित संस्था आहे. आधुनिक काळांत, वाचन संस्कृती वृद्धीचा वसा घेतलेल्या या संस्थेने हे E Book प्रकाशित केले आहे. त्यांना मनःपूर्वक धन्यवाद आणि अनेक शुभेच्छा...!

ऑनलाईन लेखन - वाचन याबद्दलची अपरिहार्यता आजच्या काळात आपण सर्वांनीच स्वीकारली आहे. ह्या ऑनलाईन गदारोळात नवदुर्गा: प्राचीन संकल्पना रूपके सारखं काही संशोधनात्मक तरीही अभ्यासपूर्ण वाचन करून रसिक वाचकांनी आपला व्यासंग वाढवावा आणि नवरात्री उत्सवाचा आनंद जरूर द्विगुणित करावा.

मनःपूर्वक शुभेच्छा!

डॉ निर्मोही फडके.
२५/१०/२०२०.
विजयादशमी.

**या लेखमालेसाठी वाचन आणि अभ्यास संदर्भ:**

**श्री दुर्गा सप्तशती, मूळ संस्कृत आवृत्ती आणि सचित्र हिंदी अनुवाद यासह दुर्गा कल्पतरू, गीता प्रेस, गोरखपूर, उ प्र,**

**THE IMAGE OF THE GODDESS DURGA AND HER WORSHIP IN BANARAS, (c) Copyright by Hillary Peter Rodrigues, October 1993, McMaster University**

**Hindu Goddesses : Visions of the Divine Feminine in the Hindu Religious Tradition - author: Kinsley, David R. publisher: University of California Press, 1988**

**Sacred Geography of the Goddesses in Kashi, India**
**Dr. Ravi S. Singh, PG Dept. of Geography, Kisan PG College, Bahraich, UP 271801, INDIA,**
**Prof. Rana P. B. Singh, Dept. of Geography, Banaras Hindu University, Varanasi, UP 221005. INDIA**

**SAPTA MATRIKAS IN INDIAN ART AND THEIR SIGNIFICANCE IN INDIAN SCULPTURE AND ETHOS: A CRITICAL STUDY**
**Meghali Goswami, Dr.Ila Gupta, Dr.P.Jha**
**Indian Institute of Technology**
**Roorkee, INDIA**

**Hindu Mythology, Vedic and Puranic, by W.J. Wilkins, 1900,**

**The Secrets of Vedas, Yogi Arobindo, 1916**

# मनोगत

ई साहित्य प्रतिष्ठानच्या वेबसाईट वरील माझ्या या पुस्तकाचे वाचन करणाऱ्या सर्व प्रेक्षकांना सस्नेह नमस्कार...!

लिखित साहित्य, शिल्प, मूर्ती, चित्र, धर्मचिह्न, रंग, रंगावली संस्कृती अशा असंख्य उपलब्ध माध्यमातील प्रतीके – रुपके – चिह्ने याचे मला नेहेमीच आकर्षण होते. माझ्या अगदी तरुण वयांत, माझ्या आईबरोबर झालेल्या आनंदमयी संवादातून मिळालेल्या प्रेरणेने मला उर्जित केले आणि माझ्या वयाच्या पन्नाशी नंतर, प्रतीकशास्त्र – रूपकशास्त्र – चिह्ने – चीह्नार्थ हा माझ्या नियमित अभ्यासाचा विषय झाला. श्री आनंद के कुमारस्वामी (१८७७ – १९४७) या रूपकशास्त्र आणि भारतीय संस्कृतीच्या थोर संशोधक – लेखकाला, त्यांचा एकलव्य शिष्य म्हणून मी गुरुस्थानी मानले आहे. मी लिहिता झालो हा माझ्या जन्मदात्या आई + वडिलांचा वारसा आहे. यांना मी वंदन करतो.

ई साहित्य प्रतिष्ठान या प्रकाशन संस्थेने प्रकाशित केलेले हे माझे पहिलेच मराठी पुस्तक. खरं म्हणजे २०२० या वर्षीच्या नवरात्री उत्सवासाठी माझ्या दीर्घ काळच्या अभ्यासावरून लिहिलेली नऊ लेखांची ही लघुलेखमाला. शुक्रवार, १६ ऑक्टोबर, २०२० या दिवशी त्याचा पहिला

लेख, माझ्या निवडक स्नेहींना **whatsapp** मध्यमातून पाठवला होता. नेमक्या दहाच दिवसांत, **नवदुर्गा: प्राचीन संकल्पना रूपके** ही लेखमाला, E साहित्य प्रतिष्ठानतर्फे **E Book (इ पुस्तक)** स्वरूपात प्रकाशित होते आहे. हे सौजन्य आणि हा वेग याचे पूर्ण श्रेय, E साहित्य प्रतिष्ठानचे संचालक स्नेही श्री सुनील सामंत आणि त्यांचे सहकारी यांना आहे. त्यासाठी त्या सर्वांना मनःपूर्वक धन्यवाद. अभ्यासासाठीचे सर्व संदर्भ लेखासोबत जोडले आहेत.

या लेखमालेतील सर्व लेखांवरील व्याकरण आणि शुद्धलेखन संस्कार, माझ्या स्नेही आणि नामवंत मराठी भाषा तज्ज्ञ डॉ निर्मोही फडके यांनी केले आहेत. ज्या त्वरेने त्यांनी लेखांवर संस्कार केले त्याच त्वरेने, माझी विनंती स्वीकारून त्यांनी या पुस्तकासाठी प्रस्तावना लिहिली. या दोन्हीसाठी, स्नेही डॉ निर्मोही फडके यांचा मी ऋणी आहे.

**लिहू आनंदे – वाचू आनंदे...!**
अरुण फडके,
विलेपारले
**विजयादशमि**
२५ ऑक्टोबर, २०२०

# शैलपुत्री



# नवदुर्गा १: शैलपुत्री

## नवरात्री घटस्थापना लेख १

नवरात्री उत्सवाच्या पहिल्या दिवशी केली जाणारी घटस्थापना हे उत्सवाचे एक वैशिष्ट्य आहे. प्रतीके – रूपके – चिह्ने या शास्त्राच्या अभ्यासामधे, नवदुर्गांच्या संकल्पनांचा आणि घटस्थापनेच्या विविध पद्धतींचा अभ्यासही करता आला होता. बनारस (वाराणशी-काशी) मधील दुर्गादेवीच्या शारदीय नवरात्रातिल घटस्थापनेतिल, घट अथवा कलश याचे, महाराष्ट्रातील मंगल कलशाशी साम्य – साधर्म्य आहे हे लक्षात आले होते. नवरात्री निमित्त या लेखमाले मधे वाचकांना नवदुर्गा या प्राचीन संकल्पनांचा आणि घटस्थापनेच्या भारतातील विविध पद्धतींचा, विस्ताराने परिचय करून देण्याची योजना आहे.

# श्रीदुर्गा सप्तशती नुसार नवदुर्गा

प्रत्येक स्त्रीच्या जन्मापासून वृद्धत्वापर्यंत, वयानुसार - स्वभावधर्मानुसार होणारे शारीरिक आणि मानसिक बदल - परिवर्तन म्हणजेच सांकेतिक स्वरूपात मांडलेले आणि वर्णन केलेले देवी दुर्गेचे नऊ अवतार किंवा तिची नऊ रूपे, हे प्रथम समजून घ्यायला हवे. **श्रीदुर्गा सप्तशती** आणि **दुर्गा कल्पतरू** या दोन्ही प्राचीन संहितांमधे, देवी दुर्गेच्या या नऊ अवतारांचे सांकेतिक अर्थ सांगून त्याचे विश्लेषण, विस्ताराने केले आहे. एकाच वेळी स्त्रीच्या व्यक्तिमत्वातील शरीरधर्म – मानसिकता – बुद्धिमत्ता या तीन पातळ्यांवर, हे विश्लेषण वैश्विक तत्वांशी तुलना करताना त्यातील साधर्म्य स्पष्ट करते. **शैलपुत्री, ब्रह्मचारिणी, चंद्रघंटा, कुष्मांडा आणि स्कंदमाता** ही देवीची पहिली पाच रूपे, स्त्रीच्या शारीरिक वयानुसार तिच्या क्षमतेचे साधर्म्य अनुक्रमे **पृथ्वी – जल – अग्नी – वायू आणि आकाश** या पंचमहाभूत

स्वरूपातील वैश्विक तत्वांशी करतानाच तिच्या मानसिक वृत्तीचा संदर्भ देतात. **कात्यायनी, कालरात्री, महागौरी आणि सिद्धीदात्री** ही देवीची शेवटची चार रूपे अनुक्रमे **मन – बुद्धी – चित्त आणि अहंकार** या स्त्रीच्या वास्तवातील गुणवत्तांचे सांकेतिक विश्लेषण करतात.

# १… शैलपुत्री: पृथ्वी तत्वाचे आणि भूमीचे प्रतीक:
# वाहन वृषभ

शैलपुत्री म्हणजे बालिकास्वरूप देवी पार्वती, पर्वताची कन्या. प्राचीन मार्कंडेय पुराणानुसार मेरू पर्वताची कन्या मिनावती आणि हिमालयाचा राजा हिमावत यांच्या दोन कन्या. पहिली **नदीदेवता गंगा** आणि **दुसरी महादेव पत्नी पार्वती**. महादेवाची पत्नी सतीने **शैलपुत्री** म्हणजे पार्वतीच्या रुपात पुनर्जन्म घेतला असा उल्लेख **श्रीदुर्गा सप्तशती** या संहितेत केला गेला आहे. **विन्ध्यवासिनी देवी असेही शैलपुत्रीला** संबोधित केले जाते. **देवी शैलपुत्री** ही पर्वतात उगम पावणाऱ्या गंगेसह सर्व नद्या – पर्वत -- भूमी – वृक्ष – औषधी वनस्पती या प्रत्येक गोष्टीचे रूपक आणि प्रतीक आहे. हिम म्हणजेच बर्फाच्या शुभ्र धवल वर्णाची ही देवता, हिमालयात ध्यान – तपश्चर्या

करणाऱ्या ऋषी – मुनींसाठी निर्मलता आणि पावित्र्याचे रूपक मानली गेली आहे. देवीच्या उपासनेने आपल्या शरीरातले **मूलाधार चक्र** जागृत होते.

तेजस्वी बालिका **देवी शैलपुत्रीच्या** सन्निध असणारा वृषभ, तिच्या जन्मानंतर, पिता राजा हिमावताने तिला तिचे वाहन म्हणून दिला. म्हणूनच तिला **वृषारूढा** आणि **उमा** या नावानी ओळखले जाते. देवी उजव्या हातात त्रिशूल आणि डाव्या हातात कमळाचे फूल धारण करते. देवी बालिका स्वरूप असूनही सक्षम आणि सबला आहे याचे प्रतीक म्हणजे तिच्या उजव्या हातातील त्रिशूळ. देवीच्या डाव्या हातातील कमळ तिच्या अलौकिक ज्ञानाचे आणि उर्जेचे प्रतीक आहे. हिमालयाची कन्या असलेल्या देवीला धवल - शुभ्र वस्त्र आणि शुभ्र फुले आवडतात. देवीला पांढऱ्या बर्फीचा नेवैद्य दाखवला जातो. देवीच्या पूजेमध्ये

सर्व नद्या – जलाशय – तीर्थे आणि पृथ्वीच्या दाही दिशाना, साधकांच्या सुख समृद्धीसाठी आवाहन केले जाते. पर्वताची कन्या असल्यामुळे देवी शैलपुत्री, पंचमहाभूतातील **पृथ्वी तत्वाचे आणि भूमीचे क्रियात्मक आणि सक्रीय प्रतीक** मानली गेली आहे.



अरुण फडके

⇑ नवदुर्गेचे पहिले रूप - देवी शैलपुत्री ⇑



श्रद्धा – भक्तीमार्ग परंपरा याने समृध्द झालेली प्राचीन भारतीय दैनंदिन जीवनशैली, **प्रतीके – रूपके -- चिह्ने** यांचा वापर करून फार समृद्ध झाली आहे. यातलेच एक प्रतीक म्हणजे **मंगल कलश.**



**सजवलेला घट – मंगल कलश.**

## मंगल कलश

**विज्ञान – तत्वज्ञान – बुद्धीमत्ता** या तीन मजबूत पायांवर भारतीय संस्कृतीचि मांडणी फार प्राचीन काळापासून झालेले आहे. **वैष्णव – शैव –**

**स्मार्त – शाक्त -- अघोर** या सर्वच हिंदू धर्मपरंपरा - पंथ - प्रणालींमधे बहुतांशी देवी - देवतां मानवसदृश आहेत. प्राचीन भारतीय संस्कृतीत, स्त्रीला फार महत्वाचे स्थान दिले गेले आहे. हा **मंगल कलश** म्हणजे कुटुंबातील स्त्रीच्या सृजनाचे आणि मातृत्वाचे व्यक्त झालेले सांकेतिक प्रतीक आहे. इथे **सृजनशील** आणि **सर्जनशील** या दोन शब्दांच्या अर्थातील फरक जाणून घेणे आवश्यक आहे. **सृजन म्हणजे उत्पत्ती** आणि **सर्जन म्हणजे निर्मिती. सृजनशील** उत्पत्तीसाठी दोन घटकांची गरज असते जसा प्रत्येक सजीवांचा युगुलधर्म. **सर्जनशील** व्यक्ति त्याची निर्मिती एकट्याने करू शकते, जसे चित्रकार – शिल्पकार त्यांची कलाकृती निर्माण करतात.

**मंगल कलश,** आपल्या कुटुंबातील – समाजातील स्त्रीचा सन्मान, अगदी प्राथमिक मांडणीत करतो. चांदी अथवा तांब्याच्या कलशात

अर्ध्यापर्यंत पाणी भरून त्यावर सोललेला नारळ, शेंडी वर असेल असा ठेवला जातो. नारळाच्या भोवताली आंब्याची पाने, देठ पाण्यात बुडेल अशी रचली जातात. नारळ हे कल्पवृक्षाचे फळ आहे तर आंब्याचे झाड आणि त्याची पाने हे समृद्धीचे प्रतीक आहे. **स्वस्तिक** चीह्नाने अंकित केलेली कलशाच्या बाहेरची बाजू **गंध + हळद + कुंकू + अक्षता + फुले** यांनी सुशोभित केली जाते. यातील **गंध** हे उपसाकाच्या श्रद्धेचे प्रतीक आहे. **हळद+कुंकू** हे स्त्रीच्या सौभाग्याचे चिह्न आहे. **तांदुळाच्या अक्षता** याचा अर्थसंकेत म्हणजे सृजनशील – सक्रिय – स्वेच्छाधारी अशा स्त्रीचे हे वर्णन आहे. **फुले** तर निसर्गाचे प्रतिनिधी. या कलशाच्या मुख म्हणजे तोंडामधे, सृष्टीच्या जन्मदात्या ब्रह्माचा निवास असतो. या कलशाच्या ग्रीवेत म्हणजेच मध्यावर शिवदेवतेचा म्हणजे पुरुषतत्वाचा निवास असतो. ग्रीवा या शब्दाचा अर्थ आहे, सृजनशील स्त्रीच्या गर्भाशयाचे

प्रवेशद्वार. या मंगल कलशाच्या तळावर श्री विष्णूचा म्हणजे पालनकर्त्या कुटुंबाचा निवास असतो. जैन संप्रदायाच्या साहित्यामधे सुद्धा या कलशाचे आणि उपासना विधीतील कलशाभिषेकाचे वर्णन विस्ताराने केले गेले आहे. या मंगल कलशाला अनेक लोकश्रद्धा – लोकश्रुती जोडल्या गेल्या आहेत. समुद्रमंथनातून प्राप्त झालेले अमृत पिण्यासाठी ब्रह्मदेवाने कलशाची निर्मिती केली. महादेवाच्या प्रत्येक मंदिरात पिंडीच्या वर, हा कलश स्थापन केलेला असतो आणि त्यातील पाण्याचा अभिषेक शिवलिंगावर सतत होत असतो.

**महाराष्ट्रात प्रचलित या मंगल कलशाची थोडीशी वेगळी आवृत्ती, बनारस (वाराणशी-काशी) मधल्या दुर्गा देवीच्या मंदिरातील नवरात्रातील घटस्थापनेच्यावेळी सिद्ध केली जाते...!!.. त्याविषयी पुढल्या लेखात वाचा...!!**

# ब्रह्मचारिणी



# नवदुर्गा २: ब्रह्मचारिणी

## नवरात्री घटस्थापना लेख २

बनारस म्हणजेच वाराणशी - काशी, या शहराचे धार्मिक आणि सांस्कृतिक महत्त्व, वाचकांना निश्चितपणे माहीत आहेच. फार प्राचीन काळापासून हिंदू धर्मियांचे धार्मिक पर्यटनाचे हे महत्त्वाचे शहर आहे. या शहराचा निश्चित उल्लेख फार प्राचीन अशा स्कंद पुराणातील काशी खंड या अध्यायामध्ये केला गेला आहे. दुर्गा (दुर्गम) या राक्षसाचा पराभव करून, आठ प्रकारच्या शक्ती धारण करणाऱ्या महादेवपत्नी महादेवीने, बनारस (वाराणशी-काशी) शहरात आपले घर वसवले. तेव्हापासून या शहरात देवीच्या नऊ रूपांची नऊ देवळे स्थापन केली गेली. त्यातले दुर्गाजी हे प्रमुख देऊळ मानले जाते.

# २... ब्रह्मचारिणी - जल तत्वाचे प्रतीक.

ब्रह्मचारी व्रताचे पालन करणारी आणि तरुण विद्यार्थिनी असे दोन संकेत देवीच्या या नावातून व्यक्त होतात. विद्यार्थीदशेतील ही **कुमारिका अविवाहित** आहे. गुरुकुलात राहून ती अध्ययन करते आहे. गुरूंच्या पत्नीव्यतिरिक्त अन्य कोणाशीही हिचा संपर्क नाही. **तप – त्याग – वैराग्य – सदाचार – संयम या सत्त्व गुणांची** देवता म्हणजे महादेवाच्या प्राप्तीसाठी हजारो वर्षे तप करणारी देवी ब्रह्मचारिणी. सामान्यतः ब्रह्मचर्याचे पालन पुरुषांनी करावे असा संकेत आहे. इथे मात्र ही ब्रह्मचारिणी दुर्गा, या व्रताचे म्हणजेच त्या विशिष्ट जीवनशैलीचे पालन करते आहे. **धैर्य - आत्मसंयम – इंद्रियनिग्रह** या गुणवत्ता अशा योगी आणि तपस्वी **ब्रह्मचारिणी दुर्गेची** वैशिष्ट्ये आहेत. देवी ब्रह्मचारिणी **जलतत्त्वाचे** प्रतीक आहे. याला काही तर्कसंगत – विज्ञाननिष्ठ निश्चित संकल्पना आहेत. निरामय कामजीवन, जननक्षमता आणि वंशवृद्धीसाठी आवश्यक असलेल्या युगुलधर्मात वीर्य आणि शुक्राणूंची उपस्थिती

अनिवार्य असते. वीर्य आणि शुक्राणूंमध्ये आणि शरीरातील रक्तामध्ये जल म्हणजे पाण्याचे प्रमाण **पृथ्वीतत्त्वानुसार** सर्वात जास्त असते. शरीरातील रक्त हे दुसरे वीर्य मानले जाते. योगी आणि तपस्वी **ब्रह्मचारिणी** दुर्गेचे वैशिष्ट्य असे की, तिचे जलयुक्तवीर्य हिम म्हणजे बर्फाच्या स्वरूपात असते, त्यामुळे ते तिच्या ब्रह्मचारिणी या रूपात प्रवाही नसते. **अशा प्रकारे ही देवी या स्त्रीबीजांडाची जपणूक - वृद्धी करते, म्हणून दुर्गेचे हे रूप जलतत्त्वाचे क्रियात्मक आणि सक्रीय प्रतीक मानले गेले आहे. (Frozen Seminal Fluid चा प्रयोगशाळेतील वापर आज विज्ञानाने सिद्ध केला आहे).** तप – त्याग – वैराग्य – सदाचार – संयम या सत्त्वगुणधारिणी अशा देवीच्या डाव्या हातात अक्षमाला आणि उजव्या हातात कमंडलू आहे. देवीच्या उपासना काळांत साधकाचे मन त्याच्या शरीराच्या स्वाधिष्ठान चक्रात प्रवेश करते.

# घटस्थापना पद्धती – बनारस (वाराणशी - काशी)

बनारस शहरात असंख्य देवळे आहेत. या देवळातील अनेक पुजारी आणि पुरोहित हे मराठी कुटुंबांच्या पार्श्वभूमीतून आले असून, किमान पाच शतकांपासून ते बनारसमध्ये स्थायिक झालेले आहेत. यामुळेच कदाचित, नवरात्री उत्सवातील घटस्थापनेचा घट अथवा कलश यावर, मागील लेखात वर्णन केलेल्या मंगल कलशाचा प्रभाव दिसतो. मागील लेखात आपल्या मंगल कलशाचे चिह्नसंकेत नक्की काय सांगतात ते आपण पाहिले. सोने, चांदी अथवा तांब्याच्या कलशात अर्ध्यापर्यंत पाणी भरून त्यावर शेंडी वर असेल असा सोललेला नारळ ठेवला जातो. नारळाच्या भोवताली आंब्याची पाने, देठ पाण्यात बुडेल अशी रचली जातात. स्वस्तिक चिह्नाने अंकित केलेली

कलशाच्या बाहेरची बाजू ही गंध, हळद, कुंकू, अक्षता, फुले यांनी सुशोभित केली जाते.

बनारसमधील नवरात्रीच्या घटस्थापनेचा घट अथवा कलश सामन्यतः मातीचा असतो. रुंद पोटाचा – निमुळत्या गळ्याचा – रुंद तोंडाचा मातीचा घट, स्वच्छ पाण्याने अर्धा भरून घेतला जातो. त्यावर हळद आणि लाल कुंकू वापरून उजव्या दिशेने वळणारे रंगीत स्वस्तिक रेखाटले जाते.



अरुण फडके

## ⇑ नवदुर्गेचे दुसरे रूप - देवी ब्रह्मचारिणी ⇑



# नवरात्रीचा घट



जमिनीपासून साधारण एक इंच उंचीचे (जाडीचे) मातीचे, अंदाजे एक चौरस फुटाचे सारवण बनवले जाते. (याच्या मापात थोडाफार फरक असू शकतो) साधारण याच आकारमानाची लादी सुद्धा वापरली जाते. त्यावर मातीचा अगदी हलका थर चढवला जातो. त्यावर धान्य पेरले आते आणि त्यावर परत मातीचा पातळसा थर चढवला जातो - हलकेसे पाणी शिंपडले आते.

तयार झालेल्या अशा चौक अथवा चौथऱ्यावर मातीचा घट ठेवण्याच्या आधी, त्याच्या गळ्यावर आंब्याची पाने, देठं पाण्यात बुडतील अशी रचली जातात आणि त्यावर सोललेला नारळ ठेवला जातो. या कलशाला लाल रंगाचे कापड गुंडाळले जाते. आता हा कलश जणू एखाद्या साडी नेसलेल्या गर्भार महिले सारखा दिसतो. या घटावर रंगीत ताज्या फुलांची नवी माळ रोज सजवली आते. या कलशाच्या चौकावर पेरलेले धान्य अंकुरते आणि त्याला **हरियाली** असे म्हटले जाते. कुटुंबात परंपरेने जपलेले एक छोटे अवजार वापरून, दसर्याच्या दिवशी हरीयालीची पाती नाजूक हातानी कापली जातात. कुटुंबातील सर्व स्त्री आणि पुरुष यावेळी एकत्र येतात. कापलेल्या हरियालीच्या पात्याच्या बनवलेल्या छोट्या जुड्या, देवीचा प्रसाद या श्रद्धेने पुरुष आपल्या कानावर खोचतात आणि महिला आपल्या केसांमध्ये माळतात.

कुटुंबातील परंपरेनुसार घटाच्या खालच्या चौकावर वेगळी रांगोळी काढली जाते. पाच अथवा सात प्रकारची धान्य पेरली जातात. आंब्याच्या डहाळ्याऐवजी अन्य झाडांची पानेही वापरली जातात. असे घट स्थापन करतांना गौरी आणि श्रीगणेश या माता+पुत्र जोडीला आवाहन करून, घटस्थापनेसाठी निमंत्रित केले जाते. अनेक कुटुंबात या घटावर **षोडश मातृका** रांगोळी रेखाटली जाते.

**षोडश मातृका** रांगोळी म्हणजे आपल्या कुटुंबातील आधीच्या सोळा मातांची आठवण काढून त्याना अलंकृत करणारी अशी रांगोळी. ही रांगोळी लाल कुंकू वापरून घटावर रंगवली जाते. प्रथम एक टिंब – त्या खाली तीन टिंबे – त्याखाली पाच टिंबे आणि शेवटी सात टिंबे अशी पांढऱ्याशुभ्र घटावर लाल टीम्बांची त्रीकोणात्मक **षोडश**

**मातृका** रांगोळी फारच सुंदर दिसते. नवरात्रीच्या उत्सवात, अशा घटामध्ये देवी निवास करते अशी देवीच्या साधकांची निश्चित श्रद्धा असते. एखाद्या कुटुंबात असे अनेक घट बसवले जातात. **मात्र बनारसमधील दुर्गाजी या देवीच्या मुख्य देवळात, देवीचे अधिष्ठान निरंतर असते त्यामुळे या देवळात घटस्थापना केली जात नाही.**

***काहीशी गूढ आणि अनाकलनीय व्यष्टी – व्यक्तिमत्व असलेली ऋतुमती देवी चंद्रघंटा आणि परंपरेने सादर होत असलेला पुराणिक कुटुंबातील नवरात्री उत्सव. याचा परिचय पुढच्या लेखात...!***



चंद्रघंटा

# नवदुर्गा ३: चंद्रघंटा

## नवरात्री घटस्थापनालेख ३

हिंदूधर्म – प्रणाली – पंथ यांमधील आपले उत्सव – सण यांची निसर्गचक्रानुसार घातलेली सांगड फार विलक्षण आहे. कुटुंबातील – समाजातील स्त्रीचे महत्त्व, तिचा आत्मसन्मान – आत्मगौरव नवरात्रीच्या घटाच्या प्रतीकांतून व्यक्त करताना त्याचवेळी भोवती धान्य पेरून उगवलेले नवे अंकुर म्हणजे सर्जनशील भूमीचा केलेला सन्मान, अशी ही नवरात्रीच्या घटस्थापनेतील सांकेतिक मांडणी. मंगल कलशाची रचना असो अथवा पारंपरिक घटाची किंवा घटस्थापनेची संकल्पना असो...यामध्ये आपल्या विद्वान पूर्वजांनी, रूपके – प्रतीके – चिह्ने यांचा वापर फार चातुर्याने केलेला दिसतो.

# ३... चंद्रघंटा अग्नी तत्वाचे प्रतीक: वाहन सिंह

**चंद्रघंटा** या नावाने परिचित पार्वतीच्या या अवताराची गुणवैशिष्ट्ये काहीशी गूढ आणि अनाकलनीय अशी आहेत. शब्दशः अर्थ पाहायचा तर **चंद्रघंटा** म्हणजे जिच्या हातात एक **घंटा** आहे अशी देवी. ही **घंटा** इंद्राच्या ऐरावताने दिलेली आहे. देवीचे वाहन सिंह याच्या डरकाळीबरोबर तिने केलेला या अद्भुत घंटेचा नाद म्हणजे पृथ्वीच्या निर्मितीच्या वेळी झालेला, महादेवाने निर्माण केलेला आदि नाद. शुंभ आणि निशुंभ या दोन दानवांच्यावरील विजयासाठी देवीने हा घंटानाद निर्माण केला. या नादनिर्मिती करणाऱ्या घंटेमुळे तिला **वागेश्वरी** या नावानेही संबोधित केले जाते.

ब्रह्मचर्याचे पालन करणारी कुमारी दुर्गा आता **चंद्रघंटा** या रूपात, किशोरवयातील **रजस्वला ऋतुजा** झालेली आहे. देवी **चंद्रघंटा, अग्नी तत्त्वाचे प्रतीक** असण्यामागे पुन्हा एकदा काही तर्कसंगत –

विज्ञाननिष्ठ निश्चित संकल्पना आहेत. सूर्यापासून प्रकाश मिळणारा चंद्र स्वयंप्रकाशी नाही म्हणून तो थंड प्रकृतीचा मानला जातो. मात्र या चंद्राच्या **अग्नितत्त्वाचा** वेगळाच प्रभाव **पृथ्वीतत्त्व** आणि **जलतत्त्वावर** नियमित होत असतो, म्हणून समुद्रात भरती आणि ओहोटी अव्याहत सुरू असते. तसाच तो प्रभाव सजीवांच्या मनावरसुद्धा होत असतो. चंद्राचा हाच प्रभाव स्त्रीशरीरातील **पृथ्वीतत्त्व** आणि **जलतत्त्वावरसुद्धा** नियमित होतो हे विज्ञान संशोधनाने सिद्ध झाले आहे.

चंद्राच्या याच **अग्नीस्वरूप** प्रभावाला **घंटा** असे संबोधन **श्रीदुर्गा सप्तशती** संहितेत वापरले आहे. **घंटा** हे संबोधन **कालवाचक** आहे. म्हणून प्रत्येक स्त्री, चंद्राच्या कलांच्या प्रभावाने, २५ ते ३२ दिवसांच्या अव्याहत चक्रात **रजस्वला** होते आणि **अग्नीतत्त्वाचे** प्रतीक बनते. याच संदर्भाने दुर्गेच्या या किशोरावस्थेतील रूपाला **चंद्रघंटा** असे संबोधित केले जाते. **(घंटा ही संज्ञा, समय – अवसर – घड्याळ या अर्थाने हिंदी भाषेत वापरली जाते.)**

देवीला **चित्रघंटा** या नावानेसुद्धा संबोधित केले जाते. यातील **चित्र** या शब्दाचा अर्थ **विस्मयकारक** किंवा **आश्चर्यकारक** असा आहे. **विस्मयकारक** दिसणारी आणि असणारी **घंटा (रजस्वला - ऋतुमती होण्याचा नियमित काल)** धारण करणारी, ती देवी **चित्रघंटा**. चंद्राच्या प्रभावाने रजस्वला होणाऱ्या स्त्रीला **शशिकला** असे अन्य संबोधनसुद्धा वापरले जाते. आता ही स्त्री सर्जनशील झाली आहे, मातृत्व धारण करण्यासाठी सिद्ध झाली आह. सिंह हे देवीचे वाहन आहे. देवीची त्वचा सुवर्णकांतीने झळाळत आहे. देवीच्या डोक्यावर **अर्धचंद्र** प्रतीक विराजमान आहे. इथे एक लक्षात घ्यायला हवे की, महादेवाने शीर्षस्थानी धारण केलेली **चंद्रकोर** ही त्याच्या व्यष्टीसाठी आणि प्रकृतीसाठी **शीतल** आहे. देवी **चंद्रघंटेच्या** मस्तकावरील **चंद्रकोर** प्रत्येक स्त्रीच्या व्यष्टीसाठी आणि प्रकृतीसाठी **अग्नीतत्त्वाचे** प्रतीक आहे. देवीच्या साधनेत आपल्या शरीरातील **मणिपूर चक्र** प्रभावित होते.





↑ **नवदुर्गेचे तिसरे रूप - देवी चंद्रघंटा** ↑



# घटस्थापना पद्धती

**एकेकाळ अविभक्त असलेल्या आणि आता नोकरी - व्यवसाया निमित्त विभक्त होऊन पुण्यात स्थायिक झालेल्या श्री मुकुंदराव पुराणिक यांच्या कुटुंबाच्या नवरात्री उत्सवातील घटस्थापना, त्यांच्याच शब्दात त्यांनी सांगितली आहे...!!**

**आमच्या घरचा नवरात्रोत्सव**: आमच्याघरी पिढ्यानपिढ्या चालत आलेले नवरात्रीचे देवीचे सोन्याचे टाक आहेत. हे टाक, ३६५ दिवस देवघरात विराजमान असतातच, पण नवरात्री उत्सवाच्या नऊ दिवसांकरता, या टाकांची एका कमलपात्रात प्रतिष्ठापना केली जाते. ते कमलपात्र मातीने भरलेल्या परडीत ठेवलं जातं. त्यात पहिल्या दिवशीच सात धान्यांचे बी पेरलं जातं. (गहू,तांदूळ,मका,मोहरी...वगैरे). हीच आमच्या नवरात्रीतील घटस्थापना. पुण्यात एक जुनं जाणतं

पूजा सामानांचं दुकान आहे. तेथे हे सप्तधान्याचं बी उपलब्ध असते. या दुकानाचं वैशिष्ट्य असं की, हिंदू पूजा-अर्चा याकरिता लागणाऱ्या यच्चयावत वस्तू येथे विक्रीसाठी उपलब्ध आहेत. श्रावण महिन्यापासून या दुकानातील गर्दी ओसंडून वाहत असते. येथे श्रद्धावान ग्राहक, वस्तूंचे भाव करीत नाहीत. देवीच्या टाकाभोवती परडीतल्या मातीत पेरलेल्या बीजांमधून उगवलेल्या गवताला नऊ दिवसात पाती उगवलेली असतात. बाजूलाच एक लाकडी स्टॅन्डवर, दररोज ताज्या फुलांची एक माळ चढवली जाते. तिळाच्या पिवळ्या पालथ्या फुलांनी ओवलेली ही फुलमाला देवींच्या मस्तकावर उभारली जाते. दररोज सकाळ-संध्याकाळ शुचिर्भूत होऊन आरती केली जाते. **अश्विन शुद्ध पक्षी, अंबा बैसली सिंहासनी हो** या आरतीत देवीची स्तुती, नऊ दिवसाचे पराक्रम आणि तिचे आशीर्वाद यांचे वर्णन आहे. मात्र आमच्या कुटुंबात ही आरती म्हणायची एक निश्चित

पद्धत आहे. म्हणजे असं की, पहिल्या दिवशी फक्त पहिलं कडवं, द्वितीयेचे दिवशी पहिलं आणि दुसरं कडवं, तृतीयेचे दिवशी तीन कडवी...या क्रमाने आरती म्हटली जाते..! घरातील स्त्रिया – पुरुष नऊ दिवस उपवास करतात. देवीला दररोज, खीर, शिरा अशा मिष्टान्नांचा नैवेद्य असतो. विजयादशमीचे दिवशी देवीचे टाक नियमित रूपे, देवघरात पुन्हा विधिवत स्थापन केले जातात...!

**(देवीचे टाक याचा अर्थ पुढील चित्रात दिसणाऱ्या मूर्ती. सोन्याच्या – चांदीच्या – तांब्याच्या – पितळी अथवा मिश्र धातूच्या पातळ पत्र्यावर अशा प्रतिमा, ठसा मुद्रित केल्या जातात).**

## ↑ देवीच्या विविध प्रतिमांचे टाक,



**नवरात्र उत्सवातील पारंपरिक घट - त्याची मांडणी - मांडणीच्या पद्धती यामध्ये अनेक रूपके - प्रतीके - चिह्न याचा वापर केलेला दिसतो. याचे अर्थसंकेत - कुष्मांडा या देवीच्या चवथ्या विस्मयकारक रूपाचा परिचय आणि बंगालमधील नवरात्रीउत्सव आणि घटस्थापना, याचा विस्तार पुढील लेखात...!!**


देवी कुष्मांडा

# नवदुर्गा ४: देवी कुष्मांडा

## नवरात्री घटस्थापना लेख ४

## देवी कुष्मांडा वायू तत्वाचे प्रतीक: वाहन सिंह

देवी पार्वतीचे अर्थातच देवी दुर्गेचे अजून एक गूढ असे रूप म्हणजे **देवी कुष्मांडा**. या **कुष्मांडा** शब्दाचा हिंदी भाषेत अर्थ आहे भोपळा प्रजातीतील, खूप बिया असलेली मोठी फळे. यांत लाल भोपळा – कलिंगड अशा मोठ्या भाजीच्या फळांचा समावेश होतो. (हा शब्द **कुश्मांडा** असाही लिहिला जातो). श्री दुर्गा सप्तशती या संहितेत देवीच्या या रूपा संदर्भात काही श्लोकांमध्ये एक उल्लेख उपलब्ध आहे. शुंभ आणि निशुंभ या दैत्यांच्या वधानंतर, **तुमच्या अडचणीत मदतीला मी निश्चित येईन** असे आश्वासन देवीने साधकांना दिले होते. मात्र त्या वेळी, मी मानवी गर्भातून जन्म न घेता वनस्पतीतून

जन्म घेईन असे देवी म्हणाली होती. एक वर्ष दुष्काळ पडला आणि प्रजेला खायला अन्न आणि प्यायला पाणी मिळेनासे झाले. त्या वेळी देवी दुर्गेने भोपळा – कलिंगड अशा मोठ्या भाजीच्या फळांच्या **शाकंबरी** रूपात जन्म घेतला आणि लोकांची भूक आणि तहान भागवली.

याच संस्कृत संहितेत उल्लेख केल्यानुसार देवी म्हणते, **मी शंभर डोळ्यांनी तुम्हाला पाहीन**. भोपळा - कलिंगड या मोठ्या फळांना अनेक बिया असतात. हे जणू तिचे शंभर डोळेच. म्हणून देवीला **शताक्षी दुर्गा** असे संबोधले जाते. **देवी पुढे म्हणते, मी लाल फळांच्या रूपाने जन्म घेईन**. या दोन्ही फळांचा रंग लाल-केशरी (अंबर) असतो म्हणून देवीला **शाकंबरी दुर्गा** असेही संबोधित केले जाते. भोपळ्याचा नैवेद्य दाखवला जातो ती देवी म्हणून ही **कुष्मांडा देवी** असे संबोधित केले जाते.

जैन साहित्यामध्ये, बाविसाव्या जैन तीर्थंकराची सहकारी म्हणून **कुष्मांडा** अथवा **कुष्मांडीनी** या एका यक्षीचा उल्लेख केला आहे. तिला **अंबिका** असेही संबोधित केले आहे. तांत्रिक परंपरेत देवीला भीतीदायक – अनाकलनीय उपदेवता – शिवाच्या भूत, प्रेत, गणांची – रोगकारक - अपायकारक भूतनायिका असे अवगुण विशेष तिला जोडले गेले आहेत. वेदिक परंपरेत तिला काही गुण विशेष सुद्धा जोडले गेले आहेत. **गोरखपुरच्या गीता प्रेसच्या श्री दुर्गा सप्तशती हिंदी आवृत्तीत** (१९८०) तिचे **गर्भवती स्त्री** असे वर्णन केले गेले आहे. **देवीच्या गर्भात तापयुक्त विश्वाची रचना आहे *(तापयुक्त संसार जिनके उदरमे स्थित है)*** असा उल्लेख आहे. ही गर्भवती देवी तेजस्वी प्रकाशग्रह असून ती विश्वाला जन्म देण्याच्या तयारीत आहे असे वर्णन विस्ताराने केले आहे.

**कुष्मांडा** या शब्दाचा अर्थ प्रवाही बीज किंवा अंड ज्यामुळे फळांची बीजधारणा आणि पुनर्निर्मिती होते. निसर्गामध्ये वृक्ष आणि वनस्पतींमध्ये असे **प्रवाही बीज अथवा अंडे (बीजांड), कुश म्हणजे लघु आणि सूक्ष्म स्वरूपात** असते आणि ते वायूतत्त्वामुळे प्रवाही होते आणि अन्य ठिकाणी रुजून निसर्गात बीजधारणा आणि पुनर्निर्मिती होते. आता असे लक्षात घ्या की, आधीच्या **चंद्रघंटा** रूपातली देवी आता विवाहित स्त्रीच्या रूपात **कुष्मांडा देवी** झालेली आहे. आता ती आपल्या उदरात बीज धारण करते, अशा सर्जनशील वनस्पतीरूपात. आता अपत्याला जन्म देऊन ती माता बनते. निसर्गचक्रात अशी बीजधारणा अव्याहत होत असते. वायूतत्त्वामुळे प्रवाही होणारे असे बीज, निसर्गात पुनर्निर्मिती करते म्हणून **कुष्मांडा देवी** वायूतत्त्वाचे **प्रतीक** आहे.



# ↟ देवी दुर्गेचे चवथे रूप देवी कुष्मांडा ↟



# पूर्व भारतातिल नवरात्री – दुर्गापूजा उत्सव.

आसाम – बिहार – झारखंड – मणिपूर – ओडिशा – त्रिपुरा – पश्चिम बंगाल या पूर्व भारतातील प्रदेश आणि राज्यांमध्ये, दुर्गापूजा हा वर्षातला सर्वात मोठा सण आहे. नेपाळ – भूतान – बांगलादेश या शेजारी राष्ट्रांतही हा उत्सव मोठ्या प्रमाणात साजरा होतो. याला **दुर्गोत्सव – शारदोत्सव** असेही संबोधित केले जाते. पूर्व भारतातील नवरात्री आणि दुर्गापूजा उत्सवाची काही खास वैशिष्ट्ये आहेत. ती भारतात साजरा होणाऱ्या उत्सवापेक्षा वेगळी आहेत. सामान्यतः शहरे आणि गावागावातील सार्वजनिक मंडळांतर्फे सामाजिक - सांस्कृतिक स्वरूपातच नवरात्री उत्सव साजरा केला जातो. मात्र काही फार थोड्या पारंपरिक जमीनदार कुटुंबातच हा उत्सव त्यांच्या घरी साजरा केला होतो. महाराष्ट्रातील

श्रीगणेशोत्सवासारखा हा नवरात्री उत्सव, घरोघरी साजरा केला जात नाही.

या प्रदेशातील नवरात्री उत्सव हिंदू पंचांगाच्या आश्विन शुद्ध षष्ठी या दिवशी सुरू होतो. या षष्ठी तिथीपासून दशमी तिथीपर्यंत या पाच दिवसांना, नेमकी विशेषणे वापरली जातात. महालयषष्ठी – महासप्तमी – महाअष्टमी – महानवमी – विजयादशमी अशा पाच दिवसांना, देवी पक्ष किंवा देवी पखवाडा असेही संबोधित केले जाते. यावेळी खूप मोठ्या मंडपात (याला पंडाल म्हणतात) देवीच्या मूर्तीची विधिवत प्रतिष्ठापना केली जाते. मात्र या वेळी घट अथवा कलश स्थापन केला जात नाही. या वेळी सांस्कृतिक कार्यक्रम सादर होतात आणि अनेक स्टॉलवर चविष्ट खाद्यपदार्थांची रेलचेल असते.

या उत्सवाची सुरुवात **अकालबोधन** या पूजाविधीने केली जाते. ही **अकाल** संज्ञा वापरण्यामागे एक निश्चित लोकश्रद्धा आहे.

श्रीरामाने रावणाशी युद्ध करण्याआधी, देवी दुर्गेची **आराधना** वसंत ऋतूत **वासंतिक नवरात्रीच्या** नऊ दिवसात केली होती. मात्र हा नवरात्री उत्सव शरद ऋतूत **शारदीय नवरात्रीमध्ये** साजरा केला जातो. म्हणून **अयोग्य वेळ** किंवा **बदललेली वेळ** अशा अर्थी ही **अकालबोधन** पूजाविधीशब्दातली **अकाल** संज्ञा व्यक्त होते. म्हणूनच या उत्सवाला **आराधना उपासना** असेही म्हटले जाते. विजयादशमीच्या दिवशी विसर्जन विधी होतो. हे विसर्जन सांकेतिक स्वरूपाचे असते. देवीच्या मूर्तीसमोर पाण्याने भरलेला मोठा रांजण ठेवलेला असतो. त्यात देवीचे प्रतिबिंब पाहिले जाते. त्यानंतर देवीच्या मूर्तीचे विसर्जन होते. विसर्जनाच्या वेळी घेतलेले पाणी **शांतीजल** म्हणून प्रत्येकाच्या डोक्यावर शिंपडले जाते. यावेळी पुरुष मंडळी एकमेकांना शुभेच्छा आलिंगन देतात याला **कोली कुला** उपचार असे म्हटले जाते. तरुण मुले आणि

मुली मोठ्या मंडळींना वाकून नमस्कार करतात आणि चरण स्पर्श करतात.



**↟ महिलांचा सिंदूर खेला ↟**



विसर्जनविधीनंतर **देवी भरण** विधी साजरा होतो. विवाहित महिला देवीच्या कपाळावर आणि पायावर (कुंकू) सिंदूर वाहतात आणि तिला निरोप देतात. त्यानंतर या महिला एकमेकींच्या कपाळावर आणि गालावर हलकासा (कुंकू) सिंदूर लावतात. असा **सिंदूर खेला** हा महिलांचा खेळ साजरा होतो. स्वतःला आणि अन्य महिलांना दीर्घ काळ सौभाग्य मिळावे - आपला पती - मुले आणि सर्व कुटुंबियांना उत्तम आरोग्य आणि दीर्घायुष्य मिळावे यासाठी या महिला एकमेकींना शुभेच्छा देतात. विशेषतः बंगालमध्ये विजयादशमीच्या दिवशी या खेळाचे फार महत्त्व आहे. यावेळी महिला लाल किनार असलेली पांढरी साडी नेसतात आणि पारंपरिक अलंकार घालतात.

बंगालमधील **सिंदूर खेला** ही जमीनदारी आणि सामंतशाहीच्या काळात सुरू झालेली, विवाहित महिलांच्या खेळाची परंपरा, साधारण पाचशे वर्षे

जुनी आहे. अलीकडच्या काळात, विवाहित महिलांसह सर्वच महिलांना यात सहभागी होता यावे अशी सामाजिक चळवळ सुरू झाली. परिणामी, अविवाहित महिला – विधवा – घटस्फोटिता – तृतीयपंथी – वेश्या व्यवसायातील महिला अशा सर्वांना या सिंदूर खेलामध्ये सहभागी करून घेतले जाते.

सांस्कृतिक विविधता हे आपल्या देशाचे वैभव आहे. तामिळनाडू-केरळ-आंध्रप्रदेश-कर्नाटक या चार दाक्षिण भारतातील राज्यात साजरा होणाऱ्या नवरात्री उत्सवाचा परीचय आणि दुर्गादेवीचे पाचवे मातास्वरूप रूप **देवी स्कंदमाता** याचा परिचय पुढच्या लेखात अवश्य वाचा…!


स्कंदमाता

# नवदुर्गा ५: स्कंदमाता

## नवरात्री घटस्थापना लेख ५

## देवी स्कंदमाता जगद्धात्री आकाश तत्वाचे प्रतीक:

## वाहन सिंह

**देवी स्कंदमाता,** सामान्य शब्दार्थच खरं तर सगळंच स्पष्ट करतो. **स्कंद** हा शिवाचा आणि पार्वतीचा पुत्र, त्याची आई – माता ती **स्कंदमाता**. हा **स्कंद**, आदियोगी महादेव शिवाच्या सैन्याचा सेनापती आहे. **स्कंद या** शब्दाचा दुसरा अर्थ आहे **थेंब** किंवा **बीज.** आदियोगी महादेव आपली पत्नी देवी पार्वतीच्या सौंदर्यावर इतका मोहित झाला की, त्याला शृंगारज्वर झाला आणि तो आपले वीर्य – शुक्राणू रोखू शकला नाही. त्या सांडलेल्या वीर्याचा एक थेंब म्हणजे **स्कंद**.

**आपल्या या सर्व आराध्य देवी-देवता या मानवसदृश आहेत आणि त्या सर्व संकल्पना**

**म्हणजे मानवी शरीर-मन-बुद्धी-आत्म्याच्या चेतनेच्या अलौकिक आणि लौकिक क्षमतांचे प्रकटीकरण आहे.** मानवी जीवन सुसह्य करण्यासाठी आपल्या बुद्धिमान पूर्वजांनी या अलौकिक क्षमतेच्या देवी-देवतांना मानवी जन्मही दिला आणि त्यामुळे मानवाचे शरीर-मन-बुद्धीच्या मर्यादा आणि विभ्रम त्या देवी-देवतानाही कधी पाळावे लागलेच होते. म्हणूनच आदियोगी महादेवाला, शृंगार भावनेत मानवी क्षमतेच्या मर्यादेत राहावे लागले होते. देवी दुर्गेच्या आधीच्या योगी आणि तपस्वी **ब्रह्मचारिणी** रूपात आणि भूमिकेत, तिच्या **धैर्य - आत्मसंयम – इंद्रियनिग्रह** या गुणवत्तांचा परिचय आपल्याला झाला आहे. **स्कंदमाता** या रूपात देवी दुर्गा आता विवाहित स्त्रीच्या मोहक रूपात आहे. **ब्रह्मचारिणी** रूपातील तिचा इंद्रियनिग्रह आता अगदी विरुद्ध भूमिकेत आहे.

स्कंदमाता पार्वती आता आपल्या पतीला शृंगारासाठी मोहित करते आहे.

एकाच वेळी, या देवी-देवतांच्या संकल्पना, मानवी जन्मातील लौकिक शरीर-मन-बुद्धीचा धर्म पाळतात आणि त्याचवेळी त्यांच्या अलौकिक दैवी क्षमतासुद्धा प्रभावी असतात. इथे वाचकांनी एक समजून घ्यायला हवे की, या गोष्टी कपोलकल्पित नाहीत तर मानवी जीवनात, स्त्रियांच्या आणि पुरुषांच्या क्षमतांच्या या सर्व कसोट्या आहेत. त्याचे दृष्टांत आहेत. पुढच्या पिढ्यांना दिलेली आव्हाने आहेत. प्रतीके-रूपके-चिह्ने-गूढार्थ-सूक्ष्मार्थ-दृष्टांत अशा लिखित साहित्यातील सर्व साधनांच्या समावेशाने आपले प्राचीन साहित्य समृद्ध झाले आहे. **मानवी जन्मात – लौकिक जीवनात मातृत्व धर्माची अलौकिक क्षमता म्हणजे शिवरायांची जिजामाता. अशीच एक उत्तम शासक – धर्मरक्षक -- रक्षणकर्ती**

**महाराणी अहिल्यादेवी. देशप्रेम – देशभक्तीचा - स्वातंत्र्याचा अंतिम उद्गार म्हणजे शिवाजी महाराज, नरकेसरी लोकमान्य टिळक आणि स्वातंत्र्यवीर सावरकर. लौकिक आणि अलौकिक क्षमतांच्या अशा कसोट्या भेदून, भारतीय इतिहासात चिरंजीव झालेली ही असंख्य रत्ने आणि मोती आहेत.**

कामदेवाने तपोभंग केल्यामुळे क्रोधित झालेला आदियोगी महादेव, कामदेवाचा वध करतो. मात्र त्यावेळी देवी पार्वतीच्या मोहाला बळी पडतो. त्याच्या सांडलेल्या वीर्यातील एक तप्त थेंब सुद्धा अलौकिक तेजस्वी शक्तीने सिद्ध असतो. वीर्याचा तो थेंब स्वीकारण्यासाठी, **स्कंदमाता रूपातली आकाश तत्त्वाची आदिमाया देवी दुर्गा** तिच्या सर्व अलौकिक क्षमतांचा वापर करते. प्रथम देवी दुर्गा, अग्निदेवता बनून तो थेंब - ते बीज स्वीकारायचा प्रयत्न करते

परंतु अग्निदेवातेला सुद्धा ते तेज सहन करता येत नाही. मग जलतत्त्वाची देवी दुर्गा तो थेंब – ते बीज, आपली बहीण गंगा नदीकडे देते. तिलाही ते तेज सहन करता येत नाही म्हणून तो थेंब – ते बीज ती वायुतत्त्वाचा वापर करून पृथ्वीवर फेकते. इथे आकाशतत्त्वाची देवी दुर्गा आपल्या सर्व अलौकिक क्षमतांचा वापर करते आहे. **आधीच्या रूपातील पृथ्वी - अग्नी – जल - वायू तत्त्वांचा प्रभावी वापर करणारी देवी दुर्गा, स्कंदमाता जगद्धात्री रूपात, अगणित-अपार-अद्भुत आकाशतत्त्वाचे म्हणजेच ब्रह्मांडाचे प्रतीक – रूपक आहे.**

पृथ्वीवर फेकलेला तो थेंब – ते बीज दक्षिण भारतातील **सार वन** या वेळूच्या वनात पडते आणि तिथे ते रुजते. तोच हा महादेव आणि पार्वतीचा पुत्र **स्कंद**. हा श्रीगजाननाचा मोठा भाऊ आहे. याच **सेनापती स्कंदाचे** पालन-पोषण **सहा**

**कृत्तिका देवी** करतात म्हणून दक्षिण भारतात याला **कार्तिकेय** या नावाने ओळखले जाते.

**सिवा-संभूती-प्रीती-संनती-अनुसूया-क्षमा** अशा या सहा कृत्तिका मातांचे दूध पिण्यासाठी **स्कंदाला सहा तोंडे** आहेत म्हणून तो **षण्मुगम** म्हणूनही ओळखला जातो. **सरवनन – मुरुगन – सुब्रमण्य – कुमार – षडानन – देवसेनापती** अशा अनेक नावांनी **स्कंद**, दक्षिण भारतात लोकप्रिय देवता आहे. **तारकासुराचा वध करण्यासाठी स्कंदाचा जन्म झाला असाही उल्लेख या संहितांतून वाचायला मिळतो.** (स्कंद पुराण – मार्कंडेय पुराण या बरोबरच हे सर्व उल्लेख, मत्स्य पुराण (प्रकरण १५८-६०) वायू पुराण (प्रकरण ३.१० ३५-४८) शिव पुराण (प्रकरण २.४.२.६२-४) या संहितांमध्ये उपलब्ध आहेत.

स्कंद पुराणातील उल्लेखानुसार आदियोगी महादेवाच्या त्या वीर्याच्या थेंबाला तेजस असे संबोधित केले आहे. अनेक देव-देवतांच्या तेजस उर्जेतून या सर्व शक्तिमान स्त्री देवतेचा जन्म झाला. वैदिक परंपरा (शैव-वैष्णव-स्मार्त) आणि तांत्रिक परंपरा (शाक्त-अघोर) या दोन्हीसह अनेक उपपंथ-परंपरेतील साहित्यात, देवीच्या गुण – अवगुणांचे असे अनेक संदर्भ अभ्यासासाठी आजही उपलब्ध आहेत.

अरुण फडके



## ⇑ दुर्गेचे पाचवे रूप देवी स्कंदमाता ⇑



# दक्षिण भारतातील नवरात्री उत्सव

**तमिळनाडू**मध्ये नवरात्री उत्सव वेगळ्या पद्धतीने साजरा होतो. **बोम्माई कोलू** या नावाने एक पारंपरिक उत्सव कुटुंबातील मुली आणि महिला साजरा करतात. घरातील एखाद्या कोनाड्यात अथवा मांडणीत देवी-देवतांच्या बाहुल्या मांडल्या जातात. अनेक मुली त्यांच्या आवडीच्या देवींच्या बाहुल्या किंवा खेळातल्या बाहुल्या बनवतात आणि त्याची सजावट आणि आरास केली जाते. कुटुंबातील आणि परिचयातील मुली - महिलाना निमंत्रित केले जाते आणि तांबुल समारंभ साजरा होतो. यावेळी **सुन्दल** हा पारंपरिक गोड पदार्थ बनवला जातो. यावेळी कुमारिकांना (ब्रह्मचारिणी) निमंत्रित केले जाते आणि त्यांना खाऊ आणि कपडे भेट दिले जातात. मराठी हळदी-कुंकू समारंभासारखाच हा समारंभ असतो.

**कर्नाटका म्हैसूर दसरा उत्सव** पाहण्यासाठी भारतातील आणि जगभरातील पर्यटक नेहमीच उत्सुक असतात. नवरात्रीतील दहा दिवस साजरा होणाऱ्या या उत्सवात म्हैसूर शहरातील काही शतकांची परंपरा असलेली विजायादशमीची मिरवणूक फारच देखणी असते. सजवलेल्या आणि अलंकार घातलेल्या हत्तींच्या अंबारीत चामुंडा देवीची मूर्ती मिरवणुकीत दिमाखात सहभागी होते. **चामुंडा हिल**च्या परिसरात अशीच मिरवणूक **चामुंडा** टेकडीची परिक्रमा करते. दस-याच्या दिवशी विद्यार्थी आपल्या शाळेत देवी सरस्वतीची पूजा करतात. या दिवशी नव्या अभ्यासाची सुरुवात केली आते. याला **विद्यारंभ** आणि **पूजा इडूप्पू** समारंभ असे संबोधन आहे. या पारंपरिक समारंभांना **इझुथूनू इरुथू** म्हटले जाते. या उपचारानंतरच तो विद्यार्थी – विद्यार्थिनी लिहिण्या – वाचण्यास सिद्ध होतात अशी एक लोकश्रद्धा आहे. अष्टमीच्या दिवशी

केरळ मधील काही देवळे, शाळा आणि काही कुटुंबात, देवी सरस्वतीची पूजा केली जाते. या पूजेला **पूजावैपु** असे संबोधन आहे.

**आयुध पूजा - सीमोलंघन: विजयादशमीच्या दिवशी** देवी चामुन्डेश्वरीने महिषासुराचा वध केल्यानंतर आपली शस्त्रे बाजूला ठेवली आणि तिने लोककल्याणाची कामे हातात घेतली अशी लोकश्रद्धा आहे. अर्जुनाने शमीच्या झाडावर ठेवलेली शस्त्रे काढून महाभारताच्या युद्धाची तयारी सुरू झाली असे दोन संदर्भ या आयुध पूजेशी ओडलेले आहेत. याच दिवशी आपल्या व्यवसायात वापरल्या जाणाऱ्या अवजारांची पूजा केली जाते. दसऱ्याच्या दिवशी नवीन कामे आणि नवीन प्रवास करायची प्रथा महाराष्ट्रामध्ये प्रचलित आहे.

नामवंत उद्योजक आणि सुवर्णकार वामन हरी पेठे यांच्या कुटुंबात साजरा होणाऱ्या, एका शतकाची परंपरा असलेल्या नवरात्री उत्सवाचा

परीचय आणि दुर्गादेवीचे सहावे रूप **देवी कात्यायनी** याचा परिचय पुढील लेखात अवश्य वाचा...!

**--○○--**

# कात्यायनी



# नवदुर्गा ६: कात्यायनी

## नवरात्री घटस्थापना

## देवी कात्यायनी मानस तत्वाचे प्रतीक: वाहन सिंह

**वैदिक परंपरा** आणि साहित्य या बरोबरच **तांत्रिक परंपरा** आणि साहित्य, असे दोन प्रमुख प्रवाह, देवी देवतांच्या अभ्यासासाठी उपलब्ध आहेत. काही सन्मान्य अपवाद वगळता, माझा लेख वाचणाऱ्या बहुतांशी वाचकाना, **तांत्रिक परंपरा – पंथ – संप्रदाय** याचा परिचय असण्याची शक्यता कमीच आहे. **शतपथ ब्राह्मण संहिता** आणि त्यातील **बृहदारण्यक उपनिषदाचे** कर्ता, **याज्ञवल्क्य ऋषी** यांच्या दोन पत्नी, **मैत्रेयी** आणि **कात्यायनी**. मात्र आजच्या लेखाच्या संदर्भातली **देवी कात्यायनी** वेगळी आहे. **देवी कात्यायनी एका तांत्रिक पंथ आणि संप्रदायाची अधिष्ठात्री देवता आहे. तैत्तरीय**

**आरण्यकामध्ये** तिच्या व्यक्तिमत्त्वाचा असा उल्लेख, **विरोचना – दुर्गी – कन्याकुमारी या तीन देवींसह केला आहे. कालरात्री – कुष्माण्डा – निद्रा – कौशिकी – विरूपा – विरूपाक्षी – विशालाक्षी – महादेवी – चंडी – दक्षि – सिवा – काली – भयदा – वेताली – सकुनी – योगिनी – भूतधात्री** या सर्व देवी, या **कात्यायनी तांत्रिक पंथामध्ये** सहभागी आहेत. मात्र या देवीच्या रूपाचे प्रयोजन समजून घेणे खूपच रंजक आहे.

आपल्या अभ्यासातील देवीच्या या नऊ रूपांचे वर्णन, लौकिक - वास्तव - तर्कनिष्ठ वैज्ञानिक दृष्टीने एकमेकांशी असलेले संदर्भ यांचे विश्लेषण, **दुर्गा कल्पतरू** या संहितेत, विस्ताराने केले आहे. **देवी दुर्गेला शक्ती आणि प्रकृती स्वरूप मानले आहे**. विश्वाच्या निर्मितीला सहाय्यभूत असलेली **पाच बाह्य तत्त्वे, म्हणजे पंचमहाभूते (External gross**

**elements). दुर्गा कल्पतरू संहितेत याला, स्थूल-अपरा तत्त्वे, असे संबोधित केले आहे. पुढची चार सूक्ष्म तत्त्वे, (Internal subtle elements). संहितेत याला अव्यक्त-परा तत्त्वे, असे संबोधित केले आहे.** ही सर्व बाह्य आणि सूक्ष्म **तत्त्वे,** देवीच्या क्षमता आहेत. त्यांची मांडणी रूपकातून करताना, मूर्ती आणि चित्र स्वरूपात ती दृश्यमान होते आहे.

पहिली चार देवी रूपे... **शैलपुत्री-पृथ्वी – ब्रह्मचारिणी-जल – चंद्रघंटा-अग्नी आणि कुष्माण्डा-वायुतत्त्व ही बाह्य म्हणजे अपरा रूपे आहेत.** प्रकृतीच्या निरंतर - नियमित प्रगतीला आवश्यक अशी ही चार **तत्त्वे, पार्थिव – लौकिक – वास्तव** या संदर्भात वापरली गेली आहेत कारण ती मानवाच्या वास्तव शारीरिक अवस्थांची रूपके आहेत. **नऊ रूपांच्या मध्यभागी असलेले देवीचे पाचवे, आकाशतत्त्वाचे रूप, पहिल्या चार आणि**

**नंतरच्या चार (बाह्य आणि सूक्ष्म) तत्त्वांचे संतुलन राखणारे आहे. याचे कारण आकाश तत्त्वाचे रूपक, सर्जनशील देवी स्कंदमाता, आदी बीज आणि आदी बिंदू (Seed and Primordial Atom) आहे, ब्रह्मांडासह प्रकृतीतील सर्व सजीव आणि वनस्पती सृष्टीची निर्माती आहे. म्हणूनच तिला जगद्धात्री म्हटले जाते. बाह्यतत्त्वांची, देवीची ही पहिली पाच रूपे, दयाळू आणि परोपकारी वृत्तीची आहेत. (Benevolent).**


जगद्धात्री देवी स्कंदमाता, निर्मिती करते म्हणूनच सजीवांच्या मनात सूक्ष्म संवेदना निर्माण होतात. देवी दुर्गेने घेतलेले हे देवी **कात्यायनीचे** रूप हे **सूक्ष्म - पराशक्तीचे** रूप आहे. **कात्यायनी, कालरात्री, महागौरी आणि सिद्धीदात्री** ही देवीची शेवटची चार रूपे, अनुक्रमे **मन – बुद्धी – चित्त आणि अहंकार** या स्त्रीच्या आणि संपूर्ण मानवज्ञातीच्या वास्तवातील

सूक्ष्म गुणवत्तांचे **(Internal subtle elements)** सांकेतिक विश्लेषण करतात.

मानवी मन हे हे सर्वात वेगवान आहे. **प्रेम – आशा – आकांक्षा – आनंद – निराशा – द्वेष - असूया – राग** अशा सर्व भावना, आपल्या **मानस** म्हणजे **मनाचे** खेळ आहेत. या मानवी संवेदनशील मनाचे नियंत्रण **देवी कात्यायनी रूपात देवी दुर्गा करते**. प्रत्येक वेळी आपल्या मनातील भावना-विचार हे दयाळू आणि परोपकारी वृत्तीचेच असतील असे नाही. **द्वेष – राग अशा भावनासुद्धा याच मनाचे खेळ आहेत. तारकासुर – शुंभ – निशुंभ – दुर्गम (दुर्गा) – महिषासुर या दानवांचे वध करणारी हीच आपली देवी दुर्गा, नेहमीच कात्यायनी रूपात असते.** लोककल्याणासाठी अशा हिंसक दुर्गा देवीला, आपण देवत्व देतच असतो. आज आपल्या देशाच्या सीमेवर लढणारा प्रत्येक सैनिक, आपल्या रक्षणासाठी अतिरेक्यांना

मारण्यासाठी हिंसाच करतो आहे, **मात्र ते शौर्य आहे क्रौर्य नव्हे**. यातला विवेकभाव आपल्याला समजत असतोच. **देवी कात्यायनी रूपात देवी दुर्गा** आपल्या मनाचे, विवेकबुद्धीने असे नियंत्रण करते.

**उडिया भाषेतील कालिका पुराणात याचा फारच समर्पक संदर्भ वाचता आला. (हिंदी आवृत्ती).** रावणाशी युद्धाला प्रारंभ करण्याआधी, श्रीरामाने देवी दुर्गेची वासंतिक नवरात्रीच्या वेळी आराधना केली होती. देवी दुर्गेने, देवी कात्यायनी रूपामध्ये, दोघांच्या मनात एकमेकांविरुद्ध राग आणि द्वेष भावना निर्माण केली. परिणामी दोघेही युद्धासाठी सज्ज झाले, अंतिम विजय विवेकाचा झाला.




↑ चौसष्ट योगिनी मंदिर, हरिपूर, ओडिशा ↑



**याच कालिका पुराणात**, दुर्जन दैत्यांचे वध करणाऱ्या, **देवी कात्यायनी** संदर्भात एक महत्त्वाचा उल्लेख वाचता येतो. ओडीशातील भुवनेश्वर जवळ, **हिरापूरमध्ये चौसष्ट योगिनींचे देऊळ आहे**. याची निर्मिती नवव्या आणि दहाव्या शतकात झाली आहे. या देवळात चौसष्ट योगीनींच्या मूर्तींसह, देवी कात्यायनीच्या नऊ, भैरवाच्या चार मूर्ती पहाता येतात. या चौसष्ट योगिनी, कात्यायनी तांत्रिक पंथाच्यासदस्य असून, उग्र मुद्रेच्या, द्विभुज शरीर मुद्रेत आहेत. दैत्यवधानंतर त्याचे शीर अथवा कवटी यांनी हातात धारण केली आहे. कुत्रा आणि लांडगा असे प्राणी त्यांच्या सन्निध आहेत. **तुमच्या – माझ्या मनाचे नियंत्रण करणारी रूपक संकल्पना म्हणजे देवी कात्यायनी.** आपल्या भारतीय संसदेची इमारत, याच चौसष्ट योगिनींच्या वर्तुळाकार देवळाच्या वास्तुरचनेच्या मांडणीनुसार बांधली गेली आहे.




अरुण फडके

↑ देवी दुर्गेचे सहावे रूप देवी कात्यायनी ↑



## नामवंत उद्योजक आणि सुवर्णकार वामन हरी पेठे यांच्या कुटुंबातील एका शतकाची परंपरा असलेल्या नवरात्री उत्सवाचा परीचय:

कै. श्री गणेश हरी पेठे आणि कै. श्री वामन हरी पेठे या दोन बंधूनी स्थापन केलेला, **वामन हरी पेठे** हा नामवंत सुवर्णकार पेढीचा व्यवसाय, शतकोत्तर वृद्धिंगत झाला आहे. एक शतकाची परंपरा असलेल्या, या कुटुंबाच्या नवरात्री उत्सवाचे नियोजन, कै. श्री गणेश हरी पेठे यांनी व्यक्त केलेल्या इच्छेनुसार नियमितपणे गेली शंभर वर्षे होत असते. या कुटुंबातील नवविवाहित दांपत्याने त्यावर्षीची पूजा करायची असा एक संकेत या कुटुंबात स्वीकृत आहे.

शेतातील माती आणून त्याचे सारवण एका चौकोनी वाफ्यात केले आते. त्यावर गहू आणि भाताच्या बीजाचे रुजवण केले आते. त्यावरील





घट किंवा कलशामध्ये दुर्वा - पैसा - सुपारी ठेवून त्यावर खास बनवून घेतलेली, बांबूने विणलेली परडी ठेवली आते. या परडीवर देवीची प्रतिष्ठापना तिचा सोन्याचा टाक मांडून केली आते. यावेळी पंचामृत अभिषेक करून श्रीसूक्ताची आवर्तने केली जातात. या घटावर दररोज झेंडूच्या फुलांची नवीन माळ चढवली जाते. बाजूच्या सोनेरी मखरात, श्रीगणेश आणि सिंहारूढ कुलदेवतेची स्थापन याच वेळी केली जाते. तिला अलंकार आणि फुलाच्या माळांनी अलंकृत केले आते.

घटस्थापनेतील घटाच्या रूपकांचे वर्णन, पेठे कुटुंबातील सौ. राधा दिलीप पेठे यांनी विस्ताराने केले आहे. घटातील दुर्वा हे सुख - समृद्धी - आनंद – व्यवसाय - वंश अशा सर्व प्रकारच्या वृद्धीचे प्रतीक आहे.





↟ पेठे कुटुंबातील
घटस्थापना
आणि
कुलदेवता स्थापना
↟



पैसे – नाणे हे श्रीलक्ष्मीचे प्रतीक आहे. सुपारी हे श्रीगणेशाचे प्रतीक आहे. या घटावरील बांबूची परडी हे वंशपात्र आहे. या परडीत तांदूळ पसरून त्यावर रेशमी कापड घालून त्यावर देवीचा टाक विधिवत स्थापन केला जातो. कुटुंबातील सर्वांचे आरोग्य उत्तम असावे आणि वंशवृद्धी व्हावी यासाठी बांबूच्या परडीच्या या प्रतीकातून देवीची मनोभावे आराधना केली आते. या नऊ दिवसात तेल आणि तुपाचे दिवे अखंड प्रज्वलित असतात. श्री दुर्गा सप्तशतीचा पाठ नित्यनेमाने म्हटला जातो. कुटुंबातील स्त्रिया आणि पुरुष या उत्सवाच्या दिवसात उपवास करतात.

गुजरातमधील नवरात्री उत्सव आणि गरबा – दांडिया नृत्य – संगीत संस्कृती आणि देवी दुर्गेचे सातवे रुप देवी कालरात्री हिचा परिचय पुढच्या लेखात नक्की वाचा...!



# नवदुर्गा ७: कालरात्री

## नवरात्री घटस्थापन लेख ७

## देवी कालरात्री बुद्धी तत्वाचे प्रतीक: वाहन गर्दभ

देवी दुर्गेचे सातवे रूप देवी कालरात्री. खरे म्हणजे हिचे दर्शनच भयकारी आहे. काळोखाशी साधर्म्य सांगणारी कृष्णवर्णी कांती, अस्ताव्यस्त विखुरलेले केस, देवीच्या गळ्यामध्ये विजेसारखी चमकणारी माळ आहे. देवीला प्रखर आणि भेदक नजर असलेले तीन डोळे आहेत, नाकातून श्वास – निःश्वास होताना अग्नीच्या प्रखर ज्वाळा फेकल्या जात आहेत. गर्दभ हे देवीचे वाहन आहे. चतुर्भुज शरीरमुद्रेतील देवीचा वरचा उजवा हात, अभय मुद्रेत आणि पुढचा उजवा हात, वरद मुद्रेत आहे. देवीने वरच्या डाव्या हातात खड्ग धारण केले आहे आणि पुढच्या डाव्या हातात देवीने काटा शस्त्र

धारण केले आहे. देवीची मुद्रा भयकारी असली तरी दर्शक आणि उपासकासाठी ती नेहेमीच परोपकारी आणि शुभसूचक असते.

प्राचीन भारतीय मूर्तीशास्त्राच्या मांडणीनुसार, कुठल्याही चतुर्भुज देवी अथवा देवतेचे वरचे दोन हात नेहेमीच अलौकिक आणि तिच्या अतींद्रिय शक्ती आणि क्षमतेची प्रतीके असतात. पुढील दोन हात आणि त्या हातात धारण केलेली आयुधे – शस्त्रे – अवजारे – वाद्य ही नेहेमीच लौकिक – वास्तव – पार्थिव संदर्भाची असतात. या मुद्रेत देवीचा वरचा उजवा हात अभय मुद्रेत आहे. सामान्यतः बहुतांशी देवी-देवतांच्या पुढच्या उजव्या हाताने अभय मुद्रा धारण केली आते. देवी कालारात्रीच्या वरच्या उजव्या हाताची अभय मुद्रा, ही तिच्या **बुद्धी तत्त्वाचे नियंत्रण करणारी देवता** या वैशिष्ट्याशी जोडलेली आहे.

**देवी कालरात्री** सजीवांच्या **बुद्धी तत्त्वाचे** नियंत्रण करते. आणि **आपली म्हणजे सजीवांची बुद्धी, आपल्यासाठी काळ आणि वेळेचे नियोजन करते. कालगणना आणि वेळेचे भान हे सजीवांच्या बुद्धीचे काम आहे.** त्यामुळे रात्रीच्या अंधाराची भीती आणि मृत्यू रात्रीच येतो या समजुतीचा पगडा हे सजीवांच्या बुद्धीचे खेळ आहेत. वेळेचे योग्य नियोजन आणि वेळेचा योग्य परिचय आणि नेमका अंदाज हे सुद्धा आपली बुद्धीच नियंत्रित करते. एखादी क्रिया करण्यासाठी योग्य वेळ कुठली ते ठरवणे आणि ती वेळ निर्माण करणे हे सुद्धा आपल्या बुद्धीचेच नियंत्रण. **मात्र, आपल्या बुद्धीच्या मार्फत नियंत्रित होणाऱ्या आपल्या आणि भोवतालच्या काळाचे भान आणि वेळेचे नियंत्रण या सर्व वेगवान क्रिया पूर्ण होण्यासाठी, सजीवांच्या क्षमतेत, त्याचे अज्ञान (अविद्या) ही एकच कमतरता असते. देवीच्या गर्दभ वाहनाचा रूपक संकेत इथे फारच**

**महत्वाचा आहे.** गर्दभ म्हणजे गाढव हा प्राणी निरुपद्रवी - मेहनती आहे. **देवीच्या सन्निध असलेला हा गर्दभ अज्ञान आणि अविद्येचे रूपक आहे.** याला समीप घेऊन, देवी साधक – उपासक -- दर्शकाला सांगते...**योग्य निर्णय घेण्यासाठी अभ्यास करा – अनुभव घ्या, काळ-वेळेचे भान ठेवा. मग तुमच्या बुद्धीचे नियंत्रण तुम्ही स्वतःच करू शकाल. या गर्दभासारखे माझ्यावर अवलंबून रहावे लागणार नाही.**

आपल्या बुद्धिमान पूर्वजांनी या देवतांच्या कार्यानुसार त्यांच्या व्यक्तिमत्वाच्या संकल्पना मांडल्या आणि चतुर आणि कुशल शिल्पकार – मूर्तिकार – चित्रकारांनी या संकल्पनांना दृश्य स्वरूप दिले. सूक्ष्म निरीक्षणाने आपल्याला या देवी-देवतांच्या शिल्प-मूर्ती-चित्रातील हे चिह्नसंकेत आणि मुळ संकल्पना वाचता येतात. गर्दभ – गाढव हे देवीचे वाहन असे संबोधित केले जात असले

तरी देवी-देवता अशा वाहनांवर कधीही स्वार होत नसतात. वाहन म्हणजे त्यांच्या सन्निध असणारा प्राणी अथवा पक्षी. चित्रातील गाढवावर बसलेली देवी हे चित्रकाराने घेतलेले स्वातंत्र्य आहे. देवी-देवतांच्या व्यक्तिमत्त्वातील अनेक वैशिष्ट्ये, या सन्निध असणाऱ्या प्राणी-पक्षी यांच्या चिह्नसंकेतातून आपल्याला वाचता येतात.



अरुण फडके

↟ देवी दुर्गेचे सातवे रूप देवी कालरात्री ↟



देवीची वरच्या उजव्या हाताची अभय मुद्रा, अभ्यास आणि अनुभवाने तुमचे अज्ञान दूर होईल असा संकेत देते आणि पुढच्या उजव्या हाताच्या वरद मुद्रेने देवी तसा आशीर्वाद देते. काळ आणि वेळेचे बुद्धीनिष्ठ उत्तम नियोजन म्हणजे काय... त्याचे नेमके उदाहरण म्हणजे अलीकडे निवृत्त झालेला आपला आवडता क्रिकेटपटू, श्री महेंद्रसिंग धोणी. यष्टीरक्षक म्हणून यष्टीमागे उभा असताना चपळाईने घेतलेले बळी आणि फलंदाजी करताना केलेल्या अद्भुत खेळी या दोन्ही वेळी, चेंडूच्या वेगाच्या - दिशेच्या – सीमारेषेच्या अंतराच्या वेळेचे त्याचे गणित हे सारे विलक्षण होते. **देवी कालरात्रीचे बुद्धी तत्त्वाचे नियंत्रण असेच काही असावे**..!!

प्रतीकशास्त्र – रूपकशास्त्र – चिह्नसंकेत याच्या अभ्यासानुसार, सामान्यतः कुठल्याही स्त्री देवतेच्या मूर्तीतील तिचे डावे शरीर, साधक –

उपासक – दर्शकाच्या बुद्धीचे म्हणजे वृत्तीचे नियंत्रण करते आणि उजवे शरीर मन म्हणजे चित्ताचे नियंत्रण करते. **देवी कालरात्री** ही तर साधक – उपासक – दर्शकाच्या बुद्धीची नियंत्रक देवता आहे. देवीच्या वरच्या डाव्या हातात खड्ग आहे. आपल्या अलौकिक क्षमतेने बुद्धीनिष्ठ उपासकाचे देवी रक्षण करते असा हा रूपक संकेत आहे. पुढच्या डाव्या हातातील काटा वापरून, देवी बुद्धीच्या अयोग्य निर्णयावर अंकुश ठेवते. आपल्या प्राचीन हिंदू संस्कृतीतील देवी – देवतांच्या संकल्पनांचा असा अभ्यास फार आनंददायी असतो...!

# गुजरात मधील नवरात्री उत्सवाचा परीचय:

आजच्या काळांत, नवरात्री उत्सवात सर्वात जास्त लोकप्रिय आहे गुजराती गरबा आणि दांडिया. याचा प्रभाव इतका विलक्षण आही की आज गुजरात पुरता मर्यादित न रहाता, गरबा ग्लोबल झालाय म्हणजे विश्वस्तरावर पोहोचला आहे. याचे व्यापारीकरण - व्यवसायीकरण मोठ्या प्रमाणावर झाले आहे. मात्र त्या आधी, हजारो वर्षांपासून, धार्मिक – अध्यात्मिक -- सामाजिक -- वैज्ञानिक अशा सर्व पातळ्यांवर, गुजराती संस्कृतीमध्ये या नवरात्रीच्या सणाचे महत्त्व खूप मोठे आहे. **गरबा हा शब्द, स्त्रीचा गर्भ यावरून आलेला आहे. याला आत्म्याची शक्ती मानले आते. या घटात, देवी दुर्गेची म्हणजे प्रकृतीची सकारात्मक ऊर्जा आपल्याला मिळावी अशा भक्तिभावाने या घटाची गुजराती कुटुंबात घराघरात स्थापन केला जातो.**

सुंदर रंगात रंगवलेल्या या घटाला त्याच्या गोल पृष्ठभागावर एका ओळीत नऊ छिद्र असतात. ही नऊ छिद्र, नऊ दुर्गांची प्रतीके आहेत. घटावरील नऊ छिद्रांच्या अशा तीन ओळी म्हणजे सत्तावीस नक्षत्रांची प्रतीके आहेत. प्रत्येक नक्षत्राला चार चरण असतात. त्यामुळे या घटाला १०८ फेऱ्या मारल्या की ब्रह्मांडाला प्रदक्षिणा घातल्याचे समाधान मिळते. यामुळे हा घट विश्वाचे प्रतीक मानला जातो. या घटात मुग – गूळ आणि एक दिवा ठेवला जातो. अशा घटात नवरात्रीच्या काळात देवी दुर्गा वास्तव्याला येते अशी उपासकांची श्रद्धा आहे. स्थापनेपासून दसऱ्यापर्यंत घाटातील दिवा प्रज्वलित रहातो.



**↑गुजराती घट**



**दांडिया नृत्य ↟**

या गरब्याची गाणी आणि गीते म्हणजे देवी दुर्गेच्या स्तुतीची आणि महिम्याची भक्तीगीते. ज्या काळात लिहिता वाचता येत नव्हते त्याकाळात मौखिक परंपरेने ही भक्तीगीते समाजात प्रचलित होती, आजही आहेत. गरब्याची पारंपरिक गाणी म्हणत सर्व वयोगटातील महिला गरबा खेळतात. (गारब नाचणे हे अयोग्य संबोधन आहे). यावेळी फक्त आपली टाळी आणि पदन्यास याचेच महत्त्व असते. कुठलेही वाद्य वाजवले आत नाही. गरबा

गातानाच्या या टाळीलाही खूप अध्यात्मिक संदर्भ आहे. टाळी वाजवून वरच्या बाजूला सोडून ती पूर्ण करणे याची एक विशिष्ट लयबद्ध पद्धत आहे. गरबा खेळताना ती स्त्री, आपल्या दैनंदिन सांसारिक समस्या आपल्या टाळीमध्ये गोळा करते आणि एक गिरकी घेऊन, उंचावर टाळी पूर्ण करून देवीच्या स्वाधीन करते आणि त्या समस्यातून मुक्त होते, अशी श्रद्धा प्रत्येक महिला, मनात जपत असते. देवी दुर्गा म्हणेच देवी पार्वतीची सर्वच प्राचीन मंदिरे उंच पर्वतावर आहेत. या भक्तीगीतांमधून, देवीने पर्वतावरून उतरून नवरात्रात आपल्या घरी वस्तीला यावे असे आवाहन केले जाते. गुजराती भक्ती परंपरेत वर्षातून, वासंतिक म्हणजे चैत्री नवरात्र – आषाढी नवरात्र – शारदीय नवरात्र – माघी नवरात्र असे चार नवरात्र उत्सव प्रचलित आहेत. यातली आषाढी आणि माघी ही दोन गुप्त नवरात्र म्हटली

जातात. हे दोन उत्सव घरातच साजरे केले जातात.

**गरबा जसा भक्तिरसाचा प्रकट अविष्कार तसा दांडिया हा श्रीकृष्ण आणि गोपिकांच्या शृंगारिक रासक्रीडा नृत्याचा प्रकट अविष्कार आहे.** यात वापरल्या जाणाऱ्या टिपऱ्या वेळूपासून बनविल्या जातात आणि या वेळूपासून बासरीही बनवली जाते. गुजरातमधील अन्य प्रदेशात **गर्बी – पढार** – अशा अन्य नृत्यशैली नवरात्रीत प्रचलित आहेत. या दोन्हीमध्ये फक्त पुरुषांचा सहभाग असतो. गर्बी या नृत्याचे वेळी फक्त ढोल आणि मंजिरी वापरली जाते. पढार हे वीररसाचे नृत्य आहे. कच्च – सौराष्ट्र मधे प्रचलित या नृत्यात, प्रत्येक पुरुषाच्या हातात तलवार असते. **मांडवी घट** म्हणजे **शक्तीतत्त्वाच्या देवीला** डोक्यावर घेऊन केला जाणारा पुरुषांचा अन्य नृत्य अविष्कार प्रचलित आहे. **टिपरी नृत्य –**

**आदिवासींचे अहवा डांगी नृत्य असे अन्य दोन नृत्य प्रकार सुद्धा प्रचलित आहेत. द्वारकेतील नवरात्री नृत्य, दीड किलोमीटरचा फेरा घेते. ठाकर ज्ञातीत रुमाली नृत्य हा वेगळा नृत्य अविष्कार प्रचलित आहे.**

या प्रत्येक नृत्यात वेगवेगळे पारंपरिक परिधान, स्त्रिया आणि पुरुष वापरतात. गुजरात मधील हा पारंपरिक नवरात्री उत्सव खूप ऊर्जा आणि उल्हास घेऊन येतो. भारतातील अन्य प्रदेशातील नवरात्री उत्सव आणि देवी दुर्गेचे आठवे रूप देवी महागौरी याचा परिचय पुढच्या लेखात नक्की वाचा...!

**--००--**



# नवदुर्गा ८: महागौरी

## नवरात्री घटस्थापना लेख ८

## देवी महागौरी चित्त तत्वाचे प्रतीक: वाहन वृषभ

बनारस शहर (वाराणशी – काशी) हे देवी दुर्गेचे वास्तव्य असलेले तिचे निवासस्थान आहे. आजच्या लेखातील देवी महागौरी, बनारस शहरातील नऊ गौरींची प्रतिनिधी आहे. श्री दुर्गा सप्तशतीमध्ये वर्णन केल्यानुसार देवी महागौरी आठ वर्षांची बालिका आहे. गौर्वार्नाच्या देवी महागौरी, शुभ्र वस्त्र आणि तशाच शुभ्र अलंकाराने नटली आहे. वृषभ तिचे वाहन आहे. बनारस मधील महागौरी देवी, उपासकांना, विश्वेवर शिवाची पत्नी, काशीची सम्राज्ञी देवी अन्नपूर्णा या नावाने परिचित आहे. देवीला भवानी या नावानेसुद्धा संबोधले आते.


देवी महागौरी, **चित्ततत्त्वाची प्रतीक** आहे कारण ती स्त्रीच्या दैनंदिन वैयक्तिक आणि खाजगी जीवनातील अनेक भावना – धारणा -- घटना यावर सकारात्मक व्यक्त भाष्य करते. अशा देवीची बनारसमधील नऊ रूपे अशी आहेत. **मुखनिर्मालिका देवी, ज्येष्ठा गौरी, सौभाग्य गौरी, शृंगार गौरी, विशालाक्षी गौरी, ललिता गौरी, भवानी गौरी, मंगला गौरी, महालक्ष्मी गौरी. मुखनिर्मालिका देवी** ही अतिशय सुंदर रूपाची विवाहोत्सुक तरूणी आहे. **ज्येष्ठा देवी** ही तिची मोठी बहीण आहे आणि तिचे लग्न होण्याची अपेक्षा आहे. कुटुंब जीवनातील चार आश्रमांपैकी गृहस्थाश्रमाचे किंवा वैवाहिक संसाराचे ती प्रतीक आहे. यालाच **ज्येष्ठ आश्रम** म्हटले जाते. ज्या स्त्रीला योग्य पती मिळाला आहे अशा स्त्रीचे रूपक आहे **सौभाग्य गौरी.** वैवाहिक जीवनात, युगुलधर्मात, पतीबरोबर निरामय कामजीवनाचा आनंद घेणाऱ्या स्त्रीचे

रूपक आहे, **शृंगार गौरी.** सुंदर आणि बोलके डोळे (मीनाक्षी – हरिणाक्षी) असलेली कामाक्षी देवीशी साधर्म्य असलेली **विशालाक्षी गौरी.** या सुंदर देवीच्या डोळ्यांतूनच, आपल्याला तिच्या समाधानी कामजीवनाचे रहस्य समजते. **ललिता गौरी** म्हणजे पतीबरोबर वैवाहिक जीवनात काम आणि शृंगाराचा योग्य ताल आणि सूर सापडलेली स्त्री आहे. काम – शृंगार याच्या पलीकडे वैवाहिक जीवनात पतीबरोबर भावनिक नाते जुळलेली, पतीसह मुलांची काळजी घेणारी कुटुंबवत्सल स्त्री म्हणजे **भवानी गौरी.** स्वभावाने शांत, वृत्तीने वत्सल आणि भक्तिमार्गी, श्रद्धावान, आनंदी, विवाहित स्त्री म्हणजे **मंगला गौरी.** समृद्ध व्यक्तिमत्त्वाची पती आणि कुटुंबाशी बौद्धिक नाते जोडलेली, धर्मनिष्ठ (वैवाहिक जीवनातील स्त्रीधर्म) कल्याणकारी – परोपकारी वृत्तीची–रक्षणकर्ती कुटुंबवत्सल यशस्वी स्त्री म्हणजे **महालक्ष्मी गौरी**



अरुण फडके

↑ दुर्गेचे आठवे रूप देवी महागौरी ↑



श्री दुर्गा सप्तशती या संहितेत स्त्रीच्या वैयक्तिक आणि किंबहुना थोड्या खाजगी जीवनातील व्यक्तिमत्त्वाचे, विस्ताराने मांडलेले हे चित्र, स्त्रियांच्या भावनिक आणि बौद्धिक नजरेतून पाहिलेले आहे. शतकानुशतके समाजातील स्त्रिया, देवी दुर्गेच्या या सर्व रूपांची मनोभावे आराधन करतात, त्यावेळी खाजगी जीवनातील या सर्व इच्छा – आकांक्षा पूर्ण व्हाव्यात हीच तिची प्रार्थना असते. **आपल्या लेखातील या नवदुर्गा, स्थिर आणि स्थायी, अपरा देवता आहेत. देवी दुर्गेच्या महाविद्या (सरस्वती) रूपातील बारा परा देवता सर्वश्रेष्ठ मानल्या जाताता.** त्या अशा - **महाविद्या – महावाणी – भारती – सरस्वती – आर्या – ब्राह्मी – महाधेनु – वेदगर्भा – ईश्वरी – महालक्ष्मी – महाकाली – महासरस्वती.** (अलीकडच्या काही पुस्तकात, **पहिली महाविद्या** आणि **शेवटची महासरस्वती** ही दोन नावे वगळून, दहा महाविद्या

देवतांचा परिचय करून दिला जातो. **मी उल्लेख केलेली देवी महाविद्या ही वरील बारा नावे, मंडण सूत्रधार यांच्या देवतामूर्तीप्रकरणं या पंधराव्या शतकातील संस्कृत ग्रंथातून संदर्भाला घेतली आहेत.**)

आपल्या विद्वान पूर्वजांनी, दैनंदिन जीवनातील स्त्रीच्या अशा सर्व क्षमता -- भावना – धारणा – इच्छा – अपेक्षा यांचा इतका सखोल अभ्यास केला आहे की, आज ही सर्व मार्गदर्शक तत्त्वे आपल्याला अभ्यासासाठी उपलब्ध आहेत…!

# हिमाचल प्रदेशातील कुल्लू व्हॅली नवरात्री उत्सवाचा परीचय:

भारतातील एक रमणीय राज्य, हिमाचल प्रदेश. राज्यातील **कुल्लू व्हॅली** हा परिसर निसर्ग सौंदर्याने समृद्ध आहे. येथी **नवरात्री उत्सव** एक अनोखे रूप घेऊन येतो. सतराव्या शतकात राजा जगतसिंग इथला शासक राजा होता. तो श्रीरामाचा भक्त होता. एके दिवशी राजा आपल्या सिंहासनावरून खाली उतरला आणि तेथे त्याने रघुनाथ म्हणजे श्रीरामाच्या मूर्तीची स्थापना केली. यापुढे राजा रघुनाथ आणि माझे वंशज इथे राज्य करतील असे त्याने घोषित केले. नंतरच्या काळात राजा अयोध्येला जाऊन आला. येताना त्याने रघुनाथ देवाची मूर्ती सोबत आणली आणि त्याची स्थापना केली. दसऱ्याच्या उत्सवासाठी राजा रघुनाथ, अन्य देवी – देवतांना **कुल्लू व्हॅलीत** आमंत्रण देतो अशी लोकश्रद्धा आहे.

**कुल्लू व्हॅलीजवळील मलाना परिसरात महर्षी जमदग्नी** यांचा आश्रम होता. आपल्या प्रवासाहून परत येताना महर्षी जमदग्नी यांनी आपल्या डोक्यावरील टोपलीत अनेक देवी-देवतांच्या मूर्ती आणल्या होत्या. वाटेत त्याना वादळाने गाठले आणि डोक्यावरील टोपलीतल्या मूर्ती दूरवर फेकल्या गेल्या. नंतरच्या काळात गावकऱ्याना या मूर्ती सापडल्या आणि त्या देवी - देवाता प्रसन्न झाल्या. तेव्हापासून **कुल्लू व्हॅलीत** हजारो देवी-देवतांचा निवास आहे अशी एक दंतकथा स्थानिक नागरिक सांगतात. अशा दंतकथां शिवाय कुठलाही इतिहास रंजक होत नसतो.



↑ कुल्लू व्हॅलीतील नवरात्री आणि दशहरा उत्सव ↑



**कुल्लू व्हॅलीतील** सात दिवसांचा नवरात्री उत्सव दसऱ्यापासून सुरू होतो. उपासक श्रद्धावान नागरिक, अनेक देवी-देवतांच्या मूर्ती मिरवणुकीने रघुनाथाच्या देवळात घेऊन येतात. ही देखणी मिरवणूक पाहण्यासाठी देश-विदेशातील पर्यटक गर्दी करतात. बिआस नदीच्या काठावरील ढालपूर या प्रचंड मैदानात, नवरात्रीचा दशहरा मेळावा भरतो. सात दिवसांच्या काळात संगीत – नृत्य -- नाटके असे अनेक सांस्कृतिक कार्यक्रम सादर होतात. शेवटच्या दिवशी मैदानात रावण दहनाचा कार्यक्रम होतो. दसऱ्यानंतर सात दिवसांनी रावण दहन करणारा हा भारतातील एकमेव विजयादशमी उत्सव आहे.

उद्याच्या नवव्या आणि अंतिम लेखात, देवी दुर्गेचे नववे रूप देवी सिद्धीदात्रीचा परिचय आणि या नऊ दुर्गांच्या रूपके – प्रतीके – चिह्नसंकेत यांचे विस्तारित विश्लेषण अवश्य वाचा...!



# नवदुर्गा ९: सिद्धीदात्री

## नवरात्री घटस्थापना लेख ९

## देवी सिद्धीदात्री अहंकार तत्वाचे प्रतीक: वाहन सिंह

साधकाच्या साधनेला पावणारी, त्याला त्याच्या उपासना आणि आराधने नुसार सिद्धीचे वरदान देणारी **देवी सिद्धीदात्री.** साधक, त्याच्या आराधनेत कुठल्या सिद्धीची अपेक्षा ठेवतो आहे याचाही विचार देवी करतेच, हे निश्चित आहे. **दुर्गा कल्पतरू** संहितेतील एका गोष्टीनुसार, **राजा सुरथ** आणि **समाधी नावाचा व्यापारी,** दीर्घ काळ **देवी सिद्धीदात्रीची** आराधना करतात. देवी प्रसन्न होते आणि दोघांना विचारते तुम्हाला काय सिद्धी हवी आहे. राजा सुरथ, म्हणतो...देवी, माझ्या शत्रूंचा पराभव करून मला माझे राज्य परत हवे आहे. मग मी दीर्घ काळ राज्य करेन. राजाची ही

मागणी, **भौतिक आणि मूर्त स्वरूपाची आहे**. देवी त्याला अपेक्षित सिद्धीचे वरदान देते.

व्यापारी समाधी हा हुशार आणि प्रद्यावान म्हणून लोकांना परिचित असतो. तो देवीला म्हणतो...**देवी मला स्वार्थ (मम इति) आणि अहंभाव (अहं इति)** या दोन दुर्गुणांपासून मुक्ती हवी आहे. तो देवीकडे या **अध्यात्मिक ज्ञानाची सिद्धी** मागतो. देवी त्याच्यावर प्रसन्न होते आणि त्यालाही अपेक्षित सिद्धीचे वरदान देते. उपासकाला असे वर देणाऱ्या दोन देवता म्हणजेच **देवी सिद्धीदात्री. देवी लक्ष्मी, उपासकाला भौतिक सिद्धी देते आणि देवी सरस्वती अर्थात महाविद्या, उपासकाला आध्यात्मिक ज्ञानाची सिद्धी देते.**

राजा सुरथ आणि समाधी व्यापाऱ्याची गोष्ट, देवी सिद्धीदात्रीचीच आहे. आधीच्या लेखात उल्लेख केल्यानुसार देवी सिद्धीदात्री **अहंकार तत्त्वाची** प्रतीक देवता आहे. सामान्यतः इंग्लिश मधून

विचार करणारा प्रत्येक वाचक, **अहंकार** हा शब्द English **EGO** असा वाचेल किंवा त्याचा असा अर्थ काढेल. **प्रत्यक्षात अहंकार म्हणजे आपले स्वतःचे अस्तित्त्व. अहंकार** म्हणजे आपली स्वतःची ओळख. आपले मन आणि बुद्धी नेहेमीच आपल्या ओळखीची – आपण स्वत: आपल्या बद्दल ठरवलेल्या प्रतिमेची – परिचयाची गुलाम असते. आपण आपली ओळख एकतर **बौद्धिक स्तरावर** निर्माण करतो अथवा **भावनिक स्तरावर** निर्माण करतो. आपल्या अशा परीचयाला – अस्तित्वाला समाजाने स्वीकार करताना जर काही अडचण आली तर आपण आपल्या परीचया भोवती भिंत बांधतो. नंतरच्या काळात हीच भिंत आपल्याला बंदिस्त करते.

देवी सिद्धीदात्री आपल्याला आपले अस्तित्त्व आणि आपली ओळख सुरक्षित ठेवण्यासाठी मार्गदर्शन करते. अहंकाराचे आणि परिचयाचे रुपांतर गर्वात होऊ नये यासाठी जागरूक रहायला

सांगते. उपासक आणि दर्शकाच्या, देवतेबरोबर होणाऱ्या नि:शब्द संवादाचे माध्यम म्हणजे ही मूर्ती आणि शरीरमुद्रा – हस्तमुद्रा – आयुधे – वाहने – वाद्य - सजीव यांचे मार्फत मिळणारे तिचे चिह्नसंकेत. ही या संवादाची चिरंतन टिकलेली भाषाच आहे. यासाठी, आपल्या विद्वान पूर्वजांचे ऋण कायम स्मरणात राहावे अशी प्रार्थना.

आकाशाकडे निर्देश करणाऱ्या या तर्जनीमुद्रेचा, मूर्तिशास्त्रानुसार व्यक्त होणारा चिह्नसंकेत विलक्षण आहे. ज्ञानप्राप्तीच्या माध्यमातून तुम्हाला वैयक्तिक प्रगतीचा मार्ग शोधायचा असेल तर तर्जनी या बोटातून व्यक्त होणारा निसर्गदत्त अहंकार, अहंभाव, आक्रमकता या सर्व भावना तुमचे वैगुण्य आहे हे जाणून घ्यावे. हे दोष तुमच्या प्रगतीतील अडसर आहेत. या सर्व दोषांवर तुमचे जाणीवपूर्वक नियंत्रण हवे तरच तुम्हाला शुद्ध ज्ञानाची प्राप्ती, निगर्वी – निर्मळवृत्तीने प्राप्त होईल.

# देवतेची तर्जनी मुद्रा – अंगुली मुद्रा



देवतेच्या मूर्तीतील तर्जनीमुद्रा नेहमीच जागरूक आणि सावध रहाण्याचा संकेत देते. तर्जनीमुद्रा धरण करणाऱ्या देवता सहसा करूण - वत्सल अशा भावनांचे संकेत देणाऱ्या पालकत्वाच्या भूमिकेत असतात. हलक्याशा वळलेल्या मुठीतील आकाशाकडे निर्देश करणारे चाफेकळीचे अथवा तर्जनीचे एकच बोट हे या मुद्रेचे वैशिष्ट्य आहे. हे बोट कधीही दर्शकाकडे रोखलेले नसते. ही मुद्रा फक्त आपले अस्तित्त्व जाहीर करते. आपण आपली शाळेतल्या दिवसांची आठवण ताजी करा. वर्ग सुरु होताना शिक्षिका आपली उपस्थिती घेतात. आपल्या

नावाचा पुकार करताच आपण आपली तर्जनी उंच करून आपण उपस्थित असल्याचे जाहीर करतो. **हेच आपले अस्तित्त्व आणि अहंकार असतो.**

वळलेल्या मुठीची अशी तर्जनी समजा आपण समोरच्या व्यक्तीकडे रोखली तर त्याला ही मुद्रा निश्चितच अपमानास्पद वाटते. याचे मुख्य कारण...**आपली तर्जनी अथवा चाफेकळी हे बोट आपल्या स्वतःच्या अहंभावनेचे, अहंकाराचे, गर्वाचे आणि अस्तित्वाचे प्रतिक मानले जाते.** असे रोखलेले तर्जनीचे बोट हे आक्रमक आणि अनेकदा हिंसकवृत्तीचे लक्षण समजले जाते. ते कसे वापरायचे, त्याचे कौशल्य आत्मसात करा असा सल्ला देवी सिद्धीदात्री देत असते.



अरुण फडके

# ⇑ दुर्गेचे नववे रूप देवी सिद्धीदात्री ⇑



या नवरात्री उत्सवानिमित्त, रूपके – प्रतीके – चिह्ने आणि त्याचे सूक्ष्म संकेत या माध्यमातून, देवी दुर्गेच्या नऊ रूपांचा परिचय करून देणारा हा नववा आणि अंतिम लेख. देवी आपल्याला सांगते आहे....तुम्ही माझी मूर्ती आणि चित्र पहाताय. त्यात प्रत्यक्ष दिसतंय त्यापेक्षा खूप काही समजून घेण्यासारखे आहे. **तत्त्वज्ञान – विज्ञान – बुद्धिमत्ता या तीन खांबांवर आधारित आपल्या भारतीय संस्कृतीची हीच गंमत आणि विशेषता आहे.**

**या लेखमालेत मी लिहिलेले देवी दुर्गेचे सर्व परिचय, शाक्त तात्त्विक परंपरेतील तांत्रिक धोरणाने लिहिलेले, दुर्गा कल्पतरू या संहितेत मांडलेले आहेत**. ही आपल्या कुटुंबातील – समाजातील आपल्याला रोज भेटणारी स्त्रीच आहे. दोन दोन वाक्यात, देवी दुर्गेच्या अर्थात प्रत्येक स्त्रीच्या या नऊ रूपांचा हा धावता परिचय.

मेरू पर्वताची कन्या मिनावती आणि हिमालयाचा राजा हिमावत यांची कन्या देवी शैलपुत्री ही बालिका स्वरूप दुर्गा आहे. देवी बालिका स्वरूप असूनही सक्षम आणि सबला आहे याचे प्रतीक म्हणजे तिच्या उजव्या हातातील त्रिशूळ. **आधुनिक काळातील बालिका आणि स्त्रियांनी यातला चिह्नसंकेत समजून घेणे आवश्यक आहे.** देवी ब्रह्मचारिणी विद्यार्थिनी आहे. ती अजूनही ऋतुमती झालेली नाही मात्र **धैर्य - आत्मसंयम – इंद्रियनिग्रह** हे तिच्या जीवनाचे ध्येय-धोरण आहे. देवी चंद्रघंटा ऋतुमती झालेली तरुणी आहे मात्र अविवाहित आहे. आता तिला तिच्या स्त्रीत्वाचा परिचय झाला आहे. देवी कुष्माण्डा आता मातृत्व अनुभवते आहे. मातृत्त्वानंतर स्त्रीची निसर्गदत्त वत्सलता आणि परोपकारी करूण भाव ती व्यक्त करते आहे.

देवी स्कंदमाता हिने आता आपल्या बाळाला जन्म दिला आहे. आपल्या बाळाला दूध

पाजण्यासाठी हिचा पान्हा आतुरला आहे. ही या ब्रम्हांडाची जन्मदात्री आहे. कुटुंबातील कुटुंबवत्सल स्त्री आहे. आई झाली असली तरी ती तरुण आहे. आपल्या पतीवर अवलंबून न रहाता ती मुलांचा आणि कुटुंबाचा सांभाळ करते आहे. ती समर्थ आणि स्वावलंबी आहे. देवी कालरात्री आता मध्यम वयाकडे झुकली आहे. तिची मातृत्वाची क्षमता आता कमी झाली आहे. ती रजोनिवृत्तीच्या कळा सहन करते आहे. तिची मुले आता मोठी होऊन स्वावलंबी झाली आहेत.

देवी महागौरी रजोनिवृत्ती नंतरची स्त्री आहे. आता ती पुन्हा आपले बाल्य अनुभवते आहे. आता ती तिच्या आवडत्या कामात आणि छंदात रमते आहे. देवी सिद्धीदात्री म्हणजे अध्यात्मिक आनंदाच्या दिशेने निघालेली वृद्धा आहे. समाजातील गरजूना मदत आणि सल्ला हे तिचे दैनंदिन काम आहे. **आनंदी दांपत्यजीवन – सुखी कुटुंब – संतुलित समाज असे तर्कशुध्द आणि**

**नैसर्गिक सुसंगती आणि सर्वसमावेशक मार्गदर्शन करणाऱ्या अशा प्राचीन संहिता फक्त आपल्या संस्कृतीतच उपलब्ध आहेत.** या देवी दुर्गेचे सगळे अविष्कार, प्रत्येक महिलेने सूक्ष्मपणाने समजून घेणे आवश्यक आहे. **याला धार्मिक तीर्थाटन समजावे, इतकीच प्राथना.** माझी ही लेखमाला आता **ई साहित्य प्रतिष्ठान यांचेतर्फे E Book स्वरूपात या दसऱ्याला प्रकाशित होते आहे हे फार आनंदाचे आहे.** त्यासाठी ई साहित्य प्रतिष्ठानच्या सर्व सदस्यांना मनःपूर्वक धन्यवाद. २०२० नवरात्रीनिमित्त लिहिलेली ही नवदुर्गा लेखमाला आता संपन्न झाली आहे. नमस्कार..!!

**--००--**

**ई साहित्य प्रतिष्ठानचे हे तेरावे वर्ष.**

**श्री. अरुण फडके यांचे ई साहित्यवर हे पहिलेच पुस्तक.**

श्री. अरूण फडके हे एक अनेक पैलू असलेले लेखक, कलाकार सामाजिक कार्यकर्ते. चिन्हे व प्राचीन भारतीय संस्कृती हा त्यांच्या सखोल अभ्यासाचा विषय. मराठी भाषेचे सौंदर्य वाढवणाऱ्या म्हणी, पुरातन इमारतींचे संवर्धन, भव्य कार्यक्रमांचे सौंदर्यशास्त्रीय आयोजन असे त्यांचे अभ्यासाचे विषय आहेत आणि या प्रत्येक विषयाच्या मुळापर्यंत जाण्याची वृत्ती व अचुक आणि नेमके लिहीण्यासाठी कष्ट घेण्याची तयारी यामुळे त्यांना साहित्यिक वर्तुळांत मानाचे स्थान आहे. सध्याच्या whatsapp युनिव्हरिसीटीच्या काळात त्यांचे लेखन ही एक मोठीच बौद्धिक मेजवानी असते.

श्री. अरूण फडके यांच्यासारखे ज्येष्ठ लेखक आपले पुस्तक ई साहित्यच्या माध्यमातून जगभरातील मराठी वाचकांना विनामूल्य देतात. असे लेखक ज्यांना लेखन हीच भक्ती असते. आणि त्यातून कसलीही अभिलाषा नसते. मराठी भाषेच्या सुदैवाने गेली दोन हजार वर्षे कवीराज नरेंद्र, संत ज्ञानेश्वर, संत तुकारामांपासून ही परंपरा सुरू आहे. अखंड. अजरामर. म्हणून तर ई साहित्यवर दिनानाथ मनोहर(२ पुस्तके), शंभू गणपुले (नऊ पुस्तके), डॉ. मुरलीधर जावडेकर (९ पुस्तके), डॉ. वसंत बागुल (१७ पुस्तके), शुभांगी पासेबंद (८ पुस्तके), अविनाश नगरकर (४ पुस्तके), डॉ. स्मिता दामले (७ पुस्तके), डॉ. नितीन मोरे (२६ पुस्तके), अनील वाकणकर (९), अनंत पावसकर(४),

मधू शिरगांवकर (६), अशोक कोठारे (बारा हजार पानांचे महाभारत), श्री. विजय पांढरे (ज्ञानेश्वरी भावार्थ), मोहन मद्वण्णा (जागतिक कीर्तीचे वैज्ञानिक(३), संगीता जोशी (आद्य गझलकारा, १६ पुस्तके), विनीता देशपांडे (७) उल्हास हरी जोशी(६), नंदिनी देशमुख (५), डॉ. सुजाता चव्हाण (८), डॉ. वृषाली जोशी(१७), डॉ. निर्मलकुमार फडकुले (१९), CA पुनम संगवी(७), डॉ. नंदिनी धारगळकर (८), अंकुश शिंगाडे(६), आनंद देशपांडे(२), डॉ. निलीमा कुलकर्णी(२), अनामिका बोरकर(३) असे अनेक ज्येष्ठ व अनुभवी, कसलेले लेखक ई साहित्याच्या द्वारे आपली पुस्तके लाखो लोकांपर्यंत विनामूल्य पोहोचवतात.

अशा साहित्यमूर्तींच्या त्यागातूनच एक दिवस मराठीचा साहित्य वृक्ष जागतिक पटलावर आपली ध्वजा फडकवील याची आम्हाला खात्री आहे. यात ई साहित्य प्रतिष्ठान एकटे नाही. ही एक मोठी चळवळ आहे. अनेक नवनवीन व्यासपीठे उभी रहात आहेत. त्या त्या व्यासपीठांतून नवनवीन लेखक उदयाला येत आहेत. आणि या सर्वांचा सामूहिक स्वर गगनाला भिडून म्हणतो आहे.

आणि ग्रंथोपजीविये। विशेषीं लोकीं 'इ'यें।

दृष्टादृष्ट विजयें। होआवे जी।